
ग्रंथाली वाचक चळवळीचे

# रुची

मे २००९ ● मूल्य १० रुपये



विजय तेंडुलकर
प्रथम स्मृतिदिन

## महाराष्ट्राची सुवर्णवार्ता...



## मराठी पाऊल पडते कुठे?


# हार्दिक अभिनंदन



**मा. दीनानाथ मंगेशकर प्रतिष्ठानतर्फे कवयित्री कै. शांताबाई शेळके यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ दिला जाणारा 'सरस्वती सन्मान पुरस्कार' या वर्षी ज्येष्ठ कवयित्री उषा मेहता यांना लाभला आहे. नुकत्याच पार पडलेल्या समारंभात गानसम्राज्ञी लता मंगेशकर यांच्या हस्ते तो त्यांना प्रदान करण्यात आला. ग्रंथाली परिवारातर्फे त्यांचे मन:पूर्वक अभिनंदन. पन्नास हजार रुपये व सरस्वतीची मूर्ती असे पुरस्काराचे स्वरूप आहे.**
**उषा मेहता यांचे 'आभास', 'अप्रूप', 'अन्वय', 'मितवा' आणि 'निरंतर' असे पाच कवितासंग्रह ग्रंथालीने प्रसिद्ध केले आहेत. कार्यकर्त्या व विश्वस्त अशा भूमिकांमधून 'ग्रंथाली' परिवाराशी अनेक वर्षे जोडलेल्या या ज्येष्ठ कवयित्रीचा झालेला सन्मान आनंददायी आहे.**

उषा मेहता यांचे नुकतेच
प्रकाशित झालेले
दोन कविता संग्रह

**मितवा** (मालिका कविता)
अल्लड-अवखळ तरुणीच्या मनातले मनोहर तरंग व्यक्त करणारी मालिका-कविता
मूळ किंमत ५० रुपये
सवलतीत ३० रुपये




**निरंतर**
हा संग्रह म्हणजे विविध अनुभवांचा मांडलेला निरंतर प्रवास आहे.
त्यात अंतर्मुखता आहे आणि वास्तवाचा घेतलेला वेधही आहे.
मूळ किंमत २०० रुपये
सवलतीत १२० रुपये



ग्रंथाली वाचक चळवळीचे मासिक

# रुची

**मे २००९**
**वर्ष २९ वे, अंक ५ वा, मूल्य १० रु.**

संपादक : **दिनकर गांगल**
या अंकाचे संपादन : **धनंजय गांगल**

मुखपृष्ठ : **ग्रंथाली संगणक विभाग**

**रुची – वार्षिक वर्गणी :संस्थांना १०० रु.**
**व्य तींना ६० रु.**

**डिमांड ड्राफ्ट, म.ऑ.'ग्रंथाली' नावे**
पत्रव्यवहार/वर्गणी पाठवण्याचा पत्ता
ग्रंथाली, महापालिका शाळेची इमारत, पहिला मजला, टोपीवाला लेन, डॉ. भडकमकर रोड पोलिस ठाण्यासमोर, ग्रँटरोड, मुंबई ४०० ००७
☎ २३८९ २४ ४५ ● फॅ स : २३८७ ५४ ८१
ग्रंथाली, इंडियन एज्युकेशन सोसायटीची म. फुले कन्याशाळा, बाबरेकर मार्ग, दादर, मुंबई ४०० ०२८ ☎ २४४७ ४८ ४३
Email - granthali01@gmail.com

**अंकात प्रसिद्ध झालेली मते ज्या त्या व्य तीची. 'ग्रंथाली' चळवळीचे 'रुची' हे व्यासपीठासमान मासिक आहे. त्यात सर्व छटांच्या विचारांना स्थान आहे. मात्र त्याच्याशी 'ग्रंथाली' विश्वस्त संस्था व तिचे विश्वस्त सहमत आहेत असे नव्हे.**

स. न.

महाराष्ट्राच्या पन्नासाव्या वर्षाच्या पदार्पणात लोकसभेसाठी फ त पंचेचाळीस ट के मतदान व्हावे हा दैवदुर्विलास म्हटला पाहिजे. जास्तीत जास्त मतदान व्हावे यासाठी अमीर खानपासून अतुल कुलकर्णीपर्यंत अनेकांनी कंबर कसली होती. पण बहुतेक त्याचेच अजीर्ण होऊन मतदारांनी बॅलेट बॉ स ऑफिसवर शो फ्लॉप केला. प्रत्यक्ष मतदान करण्यापेक्षा मेणबत्त्या लावून, मानवी साखळ्या बांधून लोकशाही जास्त बळकट होते अशा रोमँटिक मनोविश्वात आजचा तरुण आहे. बूड न हलवता, एस.एम.एस. करून किंवा इंटरनेटवर कुठे िलक करून मत देता आलं असतं तर उत्तम! जागतिकीकरणाच्या काळात जाणिवांच्या खिड या मात्र अरुंद होत चालल्या आहेत. टीव्ही., इ-मेल आणि एस.एम.एस.मधून घरबसल्या दिसते तेवढेच जग अशी धारणा होत आहे. या जाणिवांच्या कक्षा रुंद व्हाव्यात यासाठी 'ग्रंथाली' प्रयत्नशील असते. नुकतेच पुण्यात तीसेक समविचारी व्य तींनी लोकशाही मूल्य तो अनुभव मांडला आहे. या बैठकीत काय घडतेय याबद्दल राम शेवाळकर यांना कुतूहल होते. दुर्दैवाने, या बैठकीतच ते गेल्याची दु:खद बातमी कळली.

विजय तेंडुलकर काही काळ ग्रंथालीचे अध्यक्ष होते. त्यांचा ह्या महिन्यात पहिला स्मृतिदिन. जयंत पवार यांनी म.टा. २००७ मध्ये घेतलेली त्यांची मुलाखत पुनर्मुद्रित करत आहोत.

महाराष्ट्राचा हा पन्नासाव्या वर्षात प्रवेश. त्यानिमित्त डॉ. कुमार सप्तर्षी यांचा विशेष लेख.

अशा मिश्र भावनांनी हा अंक सादर करतोय. तो आपल्याला आवडेल अशी आशा व्य त करतो.

**– संपादक**

---

## अनुक्रम

● **प्रगल्भ संस्कृतीला राजकारणाचा छेद** – डॉ. कुमार सप्तर्षी / २
● **कृतार्थ मुलाखतमाला** – डॉ. श्रीखंडे / ५
● **अभूतपूर्व क्षणांचे साक्षीदार** – कुमार नवाथे / १२
● **विजय तेंडुलकर मुलाखत** – जयंत पवार / १४
● **शुभानन गांगल** / १९
● **विनायक गोखले** / २०
● **आपण नाही तर कोण?....** / सचिन मंचभाई / २२

# प्रगल्भ संस्कृतीला राजकारणाचा छेद!

**– डॉ. कुमार सप्तर्षी**

**महाराष्ट्रात जितके संत झाले, जितके समाजसुधारक झाले, जित या चळवळी झाल्या तितके संत, समाजसुधारक किंवा चळवळी देशातल्या इतर कोणत्याही प्रांतात झालेल्या आपल्याला पाहायला मिळणार नाहीत. महात्मा गांधीजींनी आपले बरेच कार्य महाराष्ट्रात केले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर महाराष्ट्रात जन्माला आले, महाराष्ट्रातच मुलींची पहिली शाळा सुरू झाली, महाराष्ट्रातच दलितांना पहिल्यांदा मंदिरप्रवेश देण्यात आला, महाराष्ट्रातच राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा जन्म झाला, यावरून महाराष्ट्राच्या वैचारिक आणि सांस्कृतिक प्रगल्भतेची कल्पना येते. मात्र, गेल्या काही वर्षांत राज्यकर्त्यांनी आपल्या सोयीसाठी केलेल्या राजकारणामुळे या प्रांताचे गाडे काहीसे बिघडत चालल्याची खंतही मनात आहे.**

कोणत्याही समाजाला, समुदायाला आपल्या संस्कृतीचा स्वाभाविक असा अभिमान असतो. मुळात संस्कृती म्हणजे काय तर समुदायाकडून साजरे होणारे सण, उत्सव, विविध कला प्रकार हे सामुदायिक आनंदाचे घटक आहेत. संस्कृतीचे घटक आहेत. मात्र संस्कृतीची व्याख्या ही या सगळ्याच्या पुढे जाणारी आणि व्यापक स्वरूपाची आहे.

सर्व प्राणिमात्रांमध्ये माणूस हा एकमेव असा प्राणी आहे की, जो निसर्गात बदल करू शकतो. इतर प्राणिमात्रांना मात्र निसर्गात बदल करण्याची परवानगी नाही. त्यामुळेच आपल्या गरजेसाठी वाहत्या नदीला बांध घालण्याचे काम माणूसच करतो. अशी कामे इतर प्राणिमात्रांकडून होताना दिसत नाही. या आणि अशा आपल्या कृतींद्वारे आपले जीवन अधिकाधिक सुरक्षित करण्याचा माणसाचा प्रयत्न असतो. मुख्य म्हणजे माणसाला मेंदू असल्यामुळे त्याला मृत्यूची जाणीव असते. आपण मरणार आहोत या जाणिवेतूनच आपले जीवन अधिकाधिक सुरक्षित करण्याचा त्याचा प्रयत्न असतो. भीती, असुरक्षितता, मत्सर, निंदा अशा कितीतरी भावना मानवी मनामध्ये वास करत असतात. यातून निर्माण होणारी असुरक्षितता माणसाला सुरक्षित मार्गांचा अवलंब करायला भाग पाडते. या सुरक्षित मार्गातूनच नागरीकरणाची प्रक्रिया पूर्ण होत असते. माणसाने स्वत:च्या जीवनाच्या सुरक्षिततेसाठी निसर्गात केलेला बदल म्हणजे नागरीकरण.

जितकी निसर्गावर अधिक मात होते तितके माणसांना एकमेकांशी अधिक गुंतागुंतीचे व्यवहार करावे लागतात. गुंतागुंतीचे हे व्यवहार सुकर व्हावेत म्हणून माणूस संस्कृती निर्माण करतो. उदा. गरिबी असेल तर सगळ्यांनी आपापसात वाटून खाणे ही आपली संस्कृती आहे. त्यामुळेच जेवताना आपण आग्रह करून अन्न वाढतो, पण अमेरिकेसारख्या देशात मात्र जेवताना आग्रह करणे अमान्य आहे, ते असंस्कृतपणाचे लक्षण मानले जाते. भौतिकीकरणाच्या पायावर मानवामानवातल्या नात्यांचे व्यवहार सुकर व्हावेत, यासाठी जी संकल्पना अमलात आली त्याला संस्कृती असे म्हणतात.

बऱ्याचदा, आपण संस्कृती म्हणजे कला, उत्सव, मनोरंजन अशी आपली समजूत असते. पण हे अर्धसत्य आहे. माणसाला आनंद झाला की, त्याला सुरक्षित वाटते, तसेच माणसाला आपण सुरक्षित आहोत, या भावनेने आनंद होत असतो. हा आनंद मिळवण्याचे विविध मार्ग म्हणजे कला, उत्सव, यात्रा, जत्रा.

प्रत्येकालाच जन्मापासूनच एक भय वाटत असते. नुकत्याच जन्मलेल्या तान्ह्या बाळालासुद्धा ते वाटत असते. या भयापासून मु त होण्याचा एक मार्ग म्हणून माणसाने ‘देव’ ही संकल्पना तयार केली. देवाच्या भ तीमुळे माणूस सुरक्षित होतो. कारण त्याच्याबद्दलचा विचार, त्याच्याविषयीच्या कथा यातून हाच संदेश माणसापर्यंत पोचत असतो. राक्षसांचा, दुष्ट शक्तींचा नाश करण्याचे कार्य देव करतात. भ तीमुळे देव पावतो आणि संकटसमयी आपले रक्षण करतो, अशाच त्या कथा असतात. या सगळ्याचा विचार असलेल्या मनाच्या कोपऱ्यातून देव निर्माण होतो. मानवी मनातल्या या भय-अभयाच्या संकल्पनांचा संस्कृतीच्या विस्ताराला हातभार लागतो.

संस्कृतीची ही व्याख्या लक्षात घेतली तर महाराष्ट्राच्या संस्कृतीचा प्रवास आपण अधिक डोळसपणे पाहू शकतो. महाराष्ट्रातली मराठी भाषा किंवा इथला मराठी समाज हा मूलत: महानुभवांनी तयार केला आहे. त्यांनी या प्रांतात खूप संचार केला. या प्रांतातल्या विविध बोली भाषांमधून त्यांनी त्या त्या ठिकाणच्या जनतेशी संवाद साधला. या विविध

बोली भाषांमधून त्यांनी मराठी भाषा समृद्ध केली. प्रमाणित मराठी बोली भाषेतून संवादभाषा तयार झाली. महानुभवांनी केलेल्या कार्याचा वारसा महाराष्ट्र प्रांतात पुढे संतांनी चालवला. या मराठी भूमीत अनेक संत होऊन गेले की, ज्यांनी समाजाला जोडण्याचा प्रयत्न केला. जातिधर्माच्या भेदाभेदांनी पोखरलेल्या समाजात सगळ्यांना एकाच छताखाली आणण्याचे कार्य संतांनी केले. 'विठ्ठल' हे त्यासाठीचे एक निमित्त होते. मराठी भाषेवर इथल्या संतांचा, त्यांच्या वाणीचा, त्यांच्या जीवनाचा परिणाम आहे, प्रभाव आहे.

आज आपण ज्या महाराष्ट्राबद्दल बोलत आहोत, तो संयु त महाराष्ट्र निर्माण होण्यापूर्वी विदर्भ, मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र , बेळगाव, मुंबई या सर्वच ठिकाणच्या आर्थिक-सामाजिक रचनेवर परिणाम करणारे घटक भिन्न स्वरूपाचे होते. महाराष्ट्राच्या निर्मितीचे स्वप्न पाहणाऱ्यांनी मात्र हे सगळे प्रांत एकत्र करण्याचा मनोदय केला होता. एस.एम.जोशी, श्रीपाद अमृत ऊर्फ अण्णा डांगे आणि आचार्य अत्रे या तीन विभूतींनी तर संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीसाठी अहोरात्र परिश्रम घेतले. अनेकांनी याकामी आपले हौतात्म्य बहाल केले. दिनांक एक मे १९६० रोजी मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती झाली पण आपण महाराष्ट्राला बेळगाव जोडू शकलो नाही, याची खंत एस.एम.जोशींना शेवटच्या क्षणापर्यंत वाटत राहिली. महाराष्ट्राची निर्मिती झाल्यानंतर एक राज्य म्हणून या प्रांताला मान्यता मिळाल्यामुळे शासन-प्रशासना च्यादृष्टीने निवडणुका आणि पुढचे सोपस्कार होऊ लागले.

महाराष्ट्रस्थापनेपूर्वीचा थोडा इतिहास आपण पाहिला तर समाजसुधारकांच्या काळात आणि त्यानंतरही म्हणजे स्वातंत्र्यलढ्याच्या काळात महाराष्ट्रात झालेल्या चळवळी विलक्षण आहेत. जातिभेद दूर करण्याची संतांनी दिलेली शिकवण पुढे नेण्याचे काम इथल्या समाजसुधारकांनी केले. 'पुराणम् स्मृती स्मरणम्' असं म्हणत लोकमान्य टिळकांनी सुरू केलेले शिवजयंती आणि गणेशोत्सव हे दोन्ही उत्सव इथल्या संस्कृतीचे पोषण करणारेच ठरले. उत्सवांच्या माध्यमातून केवळ आनंद न मिळवता त्यानिमित्ताने लोकांनी एकत्र येऊन वैचारिक मंथन करावे, अशी धारणा त्यामागे होती. महात्मा गांधींनीदेखील स्वातंत्र्यासाठी 'सत्याग्रहा'चा अवलंब करून महाराष्ट्राला वैचारिक संस्कृतीचा वारसा प्राप्त करून दिला. पुढे महात्मा गांधीजींच्या प्रेरणेतूनच महाराष्ट्रात एस.एम. जोशींसारखी उत्तुंग व्य तिमत्त्वे तयार झाली. महाराष्ट्राच्या निर्मितीमध्ये त्यांनी दिलेल्या योगदानाबद्दल वेगळे सांगण्याची गरज नाही. जोशी, डांगे, अत्रे यांनी केलेली संयुक्त महाराष्ट्राची चळवळ म्हणजे महाचळवळ होती. त्यामध्ये कोणताही जातीयवाद नव्हता. दुर्दैवाने, महाराष्ट्राच्या स्थापनेनंतर ही परिस्थिती कायम राहिली नाही. समाजकारण आणि राजकारणात जातीयवादाला महत्त्व आले, आरक्षणांचे मुद्दे उपस्थित होऊ लागले आणि त्या सगळ्याचा परिणाम महाराष्ट्राच्या संस्कृतीवरही झाला.

आज देशाची आर्थिक राजधानी बनलेले मुंबई महाराष्ट्राचा अविभाज्य भाग झाला आहे, पण एक काळ असा होता की, सुरतसारख्या औद्योगिक शहरातून व्यापाराच्या उद्देशाने मुंबईत आलेले गुजराथी, मारवाडी लोक 'मुंबईतले उच्चभ्रू आणि श्रीमंत' म्हणून ओळखले जात. याउलट मुंबईपासून जवळ असलेल्या कोकणातून आलेला मराठी माणूस छोटी-मोठी कामे करून आपला उदरनिर्वाह करत असे. महाराष्ट्रासह मुंबईतही शाहीर अमर शेख यांची 'मुंबईची लावणी', अण्णा भाऊ साठे, जंगम स्वामी यांचे पोवाडे ऐकण्यासाठी तुफान गर्दी करणारा हा कष्टकरी वर्गच होता. मुंबईत तर अशा कष्टकऱ्यांची संख्या बरीच होती.

यातूनच पुढच्या काळात 'मुंबई महाराष्ट्रात आहे; पण मुंबईत महाराष्ट्र नाही' हा विचार वेगाने विस्तारू लागला. आपण केवळ सेवक आहोत, या न्यूनगंडातून महाराष्ट्रात शिवसेना या पक्षाची निर्मिती झाली आणि मराठी भाषेचा, मराठी लोकांना मुद्दा या पक्षाने सुरुवातीला उचलून धरला. मराठी अस्मिता जागृत करण्याच्या नावाखाली संस्कृतीचे आपणच तेवढे रक्षक आहोत, हे दाखवण्यासाठी हिंसेचा मार्ग या पक्षाने अनेकदा अवलंबला.

मुंबई ही भांडवलशाही नगरी असल्यामुळे विविध प्रांतातल्या लोकांना सामावून घेण्याचे आर्थिक बळ तिच्यामध्ये आहे. शिवाय, संपूर्ण देशाचे लक्ष वेधणारी सिने इंडस्ट्री इथे असल्यामुळे 'कॉस्मॉपॉलिटन' ही संकल्पना काही काळातच मुंबईच्या अंगवळणी पडली आणि त्यामुळे आसपासच्या शहरांनाही 'मेट्रोपॉलिटन' दर्जा प्राप्त व्हायला वेळ लागला नाही. पर्यायाने त्याचा, परिणाम महाराष्ट्रातल्या संस्कृतीवर झाला. दुसरीकडे, रंगभूमीचा विचार केला तर सामाजिक नाटकांचे इंजिन महाराष्ट्रातच होते, असेच आपल्याला म्हणावे लागेल. महाराष्ट्रात जितके संत झाले, जितके समाजसुधारक झाले, जित या चळवळी झाल्या तितके संत, समाजसुधारक किंवा चळवळी देशातल्या इतर कोणत्याही प्रांतात झालेल्या आपल्याला पाहायला मिळणार नाही. महात्मा गांधीजींनी आपले बरेच कार्य महाराष्ट्रात केले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर महाराष्ट्रात जन्माला आले, महाराष्ट्रातच मुलींची पहिली शाळा सुरू झाली, महाराष्ट्रातच दलितांना पहिल्यांदा मंदिरप्रवेश देण्यात आला, महाराष्ट्रातच राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा जन्म झाला, यावरून महाराष्ट्राच्या वैचारिक आणि सांस्कृतिक प्रगल्भतेची कल्पना येते. मात्र गेल्या काही वर्षात राज्यकर्त्यांनी आपल्या सोयीसाठी केलेल्या राजकारणामुळे या प्रांताचे गाडे काहीसे बिघडत चालल्याची खंतही मनात आहे. पावसावर अवलंबून असलेल्या शेतीला पाणी देण्यात राज्यकर्ते अपयशी ठरले आहेत. यामुळे ग्रामीण भागात रोजगाराचा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. स्थलांतरितांची संख्या झपाट्याने वाढल्याने शहरातल्या झोपडपट्ट्या आणि त्या आनुषंगिक प्रश्नांची भरच पडत

आहे. स्थलांतरितामुळे संस्कृतीची सरमिसळ होऊन त्याबाबतीत एक प्रकारची संभ्रमावस्था निर्माण होत आहे.

उदारीकरण आणि जागतिकीकरणाने तरुण पिढीला रोजगाराच्या नवीन संधी दिल्या असल्या तरी जीवनशैलीवर होणाऱ्या त्याच्या परिणामातून भौतिकतेचा मार्गच व्यापला जात आहे. या सगळ्या प्रक्रियेत साहित्य आणि माध्यमांनी समतेला हातभार लावला आहे. विविध ठिकाणच्या संमेलनांमधून मंथन करण्याचे काम सुरू आहे. तरीही प्रामाणिक आणि पुरोगामी लोक हतबल व संभ्रमात आहेत, याचा खेद वाटतो. मात्र राजापूरच्या गंगेप्रमाणे ते काही काळ लुप्त झाले असून लवकरच नव्या जोमाने ते बाहेर येतील, अशी अशा मला आहे.


महाराष्ट्राच्या संस्कृतीमध्ये अन्य राज्यांप्रमाणे उपप्रवाह-उपसंस्कृती आहेत. राजकारण आणि समाज जीवनाच्या अन्य क्षेत्रातील अभिजनवर्गाची एक संस्कृती आणि सामान्य जनतेची दुसरी संस्कृती अस्तित्वात आहे. महाराष्ट्राचे वैशिष्ट्य असे की, प्रभुत्वसंपन्न जातिवर्ग यांची अभिजन संस्कृती आणि ग्रामीण जनतेची लोकसंस्कृती या दोन संस्कृतींमध्ये ताळमेळ घालण्याचा प्रयत्न बऱ्याच प्रमाणात केला जातो. तर मुंबई ही महाराष्ट्राच्या राजकीय संस्कृतीत एक महत्त्वाची वैशिष्ट्यपूर्ण उप-प्रवृत्ती आहे, असे म्हटले तर वावगे ठरणार नाही.

महाराष्ट्राची संस्कृती आणि तिचा प्रवास याबद्दल विचार करताना माझ्या मनात देशातल्या संस्कृतीबद्दल काही विचार डोकावतात. गेल्या काही वर्षांत भारताने आपल्या भौतिक प्रगतीसाठी पाश्चिमात्य राष्ट्रांशी हातमिळवणी केली आहे. यातून भौतिक प्रगतीचा मार्ग खुला झाले हे वास्तव असले तरी त्याच्या आनुषंगिक परिणामांचा विचार आपण करतो आहोत का खरा प्रश्न आहे. प्रगतीबरोबरच पाश्चिमात्य संस्कृतीच्या प्रभावाला आपला दरवाजा आपण सताड उघडा केला आहे, हेही लक्षात ठेवले पाहिजे. स्पर्धा आणि आत्मकेंद्रितता या घटकांवर पाश्चिमात्य संस्कृती उभी आहे. तर भारतीय संस्कृती 'वाटून घेणे' (शेअरिंग) या तत्त्वावर अवलंबून आहे. भारतीय समाजरचना श्रेणीबद्ध उतरंडीवर व आत्यंतिक विषमतेवर उभी असूनही शेकडो वर्षे टिकून राहिली, ती तिच्या याच वैशिष्ट्यामुळे.

मात्र आता या वैशिष्ट्यालाच छेद जाऊ लागला आहे. स्वार्थी वृत्तीतून हिंसेला खतपाणी घातले जात आहे आणि त्याचे परिणाम समाजातल्या केवळ संस्कृतीवरच नाही तर सर्वच घटकांवर होऊ लागले आहेत.

---

शब्दांकन : **ममता क्षेमकल्याणी**


# डॉ. अरुण लिमये

## आठवणींचा कॅलिडोस्कोप

अरुण हुशार विद्यार्थी होता. त्याने फर्स्ट क्लास मिळवून कोणत्या तरी विषयाचा स्पेशालिस्ट व्हावे असे त्याच्या प्राध्यापकांना वाटे. मी अरुणशी याबाबत बोललो तेव्हा तो म्हणाला, 'जयप्रकाश नारायण अमेरिकेमध्ये इंजिनिअरींगच्या अभ्यासासाठी गेले, परंतु पुढे त्यांना सोशल इंजिनिअरींग अधिक महत्त्वाचे वाटू लागले. मला स्पेशालिस्ट होऊन मूठभर श्रीमंत पेशंटवर उपचार करण्यात रस नाही. आपल्या समाजातील सर्वसामान्य माणसाचा डॉक्टर होणेच मला अधिक आवडेल'.

ग.प्र. प्रधान

मूल्य १५० रुपये
सवलतीत ९० रुपये
घरपोच ११० रुपये

वितरण
ग्रंथाली

# लवकर श्रीमंत होणारा डॉक्टर ऑनेस्ट असणं शक्य नाही!

– डॉ. वि.ना. श्रीखंडे

डॉ. वि.ना. श्रीखंडे यांची मुलाखत हे 'कृतार्थ मुलाखतमाले'तील दहावे पुष्प होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक 'ग्रंथाली'चे विनायक गोखले यांनी केले. त्यानंतर डॉ. श्रीखंडे, न्या. धनंजय चंद्रचूड, पॉप्युलर प्रकाशनचे रामदास भटकळ व मुलाखत घेणारे शिरीष वीरकर यांचे धनंजय गांगल यांनी पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.

डॉ. श्रीखंडे यांच्या 'आणि दोन हात' या पुस्तकाचे प्रकाशन न्या. धनंजय चंद्रचूड यांच्या हस्ते झाले. प्रकाशन झाल्यावर न्या. धनंजय चंद्रचूड यांनी डॉ. श्रीखंडे यांचा परिचय ओघवत्या इंग्रजी भाषेत करून दिला. चंद्रचूड म्हणाले की, ''माझा डॉ. श्रीखंड्यांशी प्रथम संबंध १९९८ मध्ये आला. त्यांनी माझ्या दोन वर्षाच्या मुलाचं ऑपरेशन केलं. त्यानंतर एकदा गोव्याला जाताना मला अपघात झाला. मी मुंबईला परत आलो. मिसेस तुळजापूरकर यांनी मला श्रीखंडे लिनिकमध्ये जाण्यास सुचवलं. मी त्याच संध्याकाळी तेथे गेलो. डॉ. श्रीखंडेंनी मला पाहिलं. ते म्हणाले, की दोन प्रॉब्लेम आहेत एक म्हणजे कधी नव्हे ती आज नेमकी मुंबईत वीज नाही आणि दुसरं म्हणजे मी अशा प्रकारची केस कधी हाताळली नाही. पण माझं तत्त्व आहे की माझ्या लिनिकमध्ये आलेल्या पेशंटला मी तसाच जाऊ देत नाही.''

त्या संध्याकाळी श्रीखंडेंचा मुलगा शैलेश माझ्या बाजूला दिवा घेऊन उभा राहिला आणि डॉ. श्रीखंडेंनी माझ्या हातावर, चेहऱ्यावर शरीरात घुसलेल्या काचा काढल्या. त्यांनी अगदी सगळ्याच्या सगळ्या काचा काढल्या. अँड हील माय वुड अॅज अॅम अेमीनंट सर्जन. द हीलिंग माय वुंडस् नॉट मिअरली वुईथ हीज ए सपर्टीज बट हीलिंग माय वुंडस् वुईथ हीज विस्दम अँड हिज लर्निंग. अशा प्रकारे मी डॉ. श्रीखंडे यांच्या संपर्कात आलो.

डॉ टरी हा आता बिझनेस झाला आहे. डॉ टर-पेशंट या नात्यापेक्षा त्या बिझनेसला महत्त्व आलं आहे. केवळ पैशाला महत्त्व देणारे डॉ टर आपल्या आजुबाजूला खूप असतात, पण डॉ. श्रीखंडे हे त्याला अपवाद आहेत.

माझ्या अपघातानंतरही मी डॉ. श्रीखंडे यांना अनेक वेळा भेटलो. प्रत्येक वेळी मी त्यांच्याकडून नवीन काहीतरी शिकून बाहेर पडतो. मला त्यांच्या साहित्यविषयीच्या व्यासंगाचं आश्चर्य वाटतं. जीवनाकडे पाहण्याचा त्यांचा दृष्टिकोन, सामाजिक बांधिलकी हे सगळं पाहून मी अचंबित होतो.

डॉ. श्रीखंडे म्हणतात, ''ए गुड सर्जन मस्ट नो व्हेन टू ऑपरेट अँड व्हेन नॉट टू ऑपरेट, जस्ट अॅज गुड क्रॉस ए झामिनर मस्ट नो व्हेन टू आस्क द वेश्चन इन द कोर्ट. धीज वॉज द विस्दम फ्रॉम हीज फादर. 'आणि दोन हात' या श्रीखंडे यांच्या पुस्तकाचे वैशिष्ट्य म्हणजे 'सिंपलीसिटी ऑफ अॅनालिसिस.' त्या पुस्तकात फॅसिनेटिंग थॉटस् आहेत. हे पुस्तक एक-दोनदा वाचण्यापेक्षा ते तुम्ही स्वत:जवळ तुमचा सोबती म्हणून सतत बरोबर ठेवावे आणि पुन:पुन्हा वाचावे.

न्या. धनंजय चंद्रचूड यांच्या भाषणानंतर प्रत्यक्ष मुलाखतीला सुरुवात झाली. शिरीष वीरकर यांनी डॉ. श्रीखंडे यांची मुलाखत घेतली.

शिरीष वीरकर – 'कृतार्थ' या 'ग्रंथाली'च्या मालेचे हे दहावे पुष्प आहे. समाजाला ज्यांनी काही दिलं आहे अशा व्य तींबद्दल कृतज्ञता व्य त करण्याचा हा छोटासा प्रयत्न. आयुष्याची सारी आव्हानं पेलत एखादी व्य ती आयुष्याच्या शिखरापर्यंत पोचते. मागे वळून पाहताना स्वत:बरोबर इतरांचा, समाजाचाही उत्कर्ष आपल्या हातून झाला आहे ही जाणीव त्यांना समाधान देते. हा प्रवास कसा झाला, त्यांचं जीवन कसं उजळलं ते त्यांच्याकडून जाणून घेण्याचा हा प्रयत्न आहे. न्या. चंद्रचूड यांनी ओघवत्या भाषेत श्रीखंडेंबद्दल माहिती दिली. न्या. चंद्रचूड यांचे वडील जज होते. श्रीखंडेंचे वडीलही जज होते आणि आता श्रीखंडेंचे लिनिक चालवणारे त्यांचे जावई डॉ. नान्दे यांचे वडीलही जज होते असा हा जज ते डॉ टर असा पिढ्यांचा प्रवास आहे.

आपण जेवणापूर्वी 'वदनी कवळ घेता' हा श्लोक म्हणतो त्यात 'उदरभरण नोहे जाणिजे यज्ञकर्म' अशी ओळ आहे. यज्ञात कोणत्या समिधा किती टाकाव्या हे ठरलेलं असतं. तसंच जठराग्नीमध्ये अन्नाची समिधा टाकायची असते पण आपण ते भान ठेवत नाही त्यामुळे डॉ. श्रीखंडेंना शल्यकर्म करावं लागतं.

डॉ. श्रीखंडे, तुमचे अनेक सुहृद येथे आज आले आहेत. तुमच्यावरल्या प्रेमापोटी ते आले असणार. हे लोकप्रेम तुम्ही कसं मिळवलंत? तुमचं यश नेमकं कशात आहे?

डॉ. श्रीखंडे – एक तर मी खूप जगलो आहे त्यामुळे असेल. मी पहिली शस्त्रक्रिया १९५४ मध्ये केली. मला माणसांना भेटायची आवड आहे. आमच्या घरी नातेवाईकांचा राबता असायचा. वडील वकील असल्यामुळे त्यांचे पक्षकार यायचे. ते दिसायचे साधे पण

काहीजण खूप हुशार असायचे. यातून मला एक बोध मिळाला की कपड्यावरून माणसाची परीक्षा करू नका. बेळगावच्या आमच्या घरी अनेक माणसं यायची. आमचं काम असायचं की त्यांना स्टेशनवरून घेऊन यायचं.

१९४०चा काळ होता तो. घरात शिस्त होती. टॉयलेटहून आल्यावर हातपाय स्वच्छ धुतले पाहिजेत. नंतर आम्ही त्यांच्या हातावर राख ठेवायचो. मग ते त्या राखेनं दात घासायला लागायचे. घर माणसांनी भरलेलं असायचं. मला लोकांचं बोलणं ऐकायला आवडतं, 'जगाचे बंध कोणाला, जगाला बांधला त्याला', आम्हाला लोक आवडतात.

*वीरकर – डॉ टरसाहेब, आपण इंग्लंडला गेलात. दोन एफ.आर.सी.एस. केलीत. तिथे प्रॅ टिसही केलीत तो जो काळ होता. त्याच्या पुढच्या जडणघडणीत किती महत्त्वाचा रोल आहे?*

*डॉ. श्रीखंडे* – मला इंग्लंडमध्ये खूप गोष्टी शिकायला मिळाल्या. तेथे खूप शिस्त होती. शिस्त म्हणजे आराखडा. आमचा बॉस रोज एक कार्ड घेऊन यायचा. त्यावर कुठल्या गोष्टी करायच्या ते लिहून ठेवायचा आणि काम झालं की काट मारायचा. मला ते फार आवडलं. माझ्या हातात अजूनही डायरी असते.

दुसरं असं, की शांतपणे दुसऱ्याचं बोलणं ऐकून घ्यायचं, त्याशिवाय आपलं मत द्यायचं नाही. ट्राय टू अंडरस्टँड फर्स्ट अँड देन बी अंडरस्टूड इन लाईफ. बोलण्यात उथळपणा नको. माझ्या बोलण्यात दोष आहे पण इंग्लंडमध्ये त्यावर कोणीही कॉमेन्ट केली नाही. त्यांच्या चेहऱ्यावर अेम्ब्रॅसमेंट दिसली नाही. माझं बोलणं लोक शांतपणे ऐकून घ्यायचे.

एक किस्सा सांगतो. आम्ही शनिवारी दुपारी एकदा गाडीनं बाहेर चाललो होतो. गाडीत एका लहान मुलानं प्लेइंग प्लेन आणलं होतं. आमच्यापैकी एका मित्राचा त्यावर पाय पडला आणि कचकन् ते विमान मोडलं. मी त्या मुलाला सॉरी म्हटलं. तो मुलगा म्हणाला, ''आय नो यू डिडंट डू इट इंटेशनली. आय नो हाऊ टू रीपेअर इट!'' ते विमान घेऊन तो मुलगा ग्राऊंडवर खेळणार होता. ही घटना आहे १९५८ मधली. त्यावेळी मी मित्राला पुण्यातला एक अनुभव सांगितला १९४७ सालचा. माझा एक मित्र पुण्याला डे कन जिमखाना रस्त्यावरून सायकलवरून चालला होता. त्याच्या कोणाला तरी ध का लागला. थोडाफार मारही लागला. त्या माणसानं मित्राला सायकलवरून उतरवलं. त्याच्या आईवडील, भाऊ, बहिणींचा उद्धार केला. हाच त्यांच्या आणि आपल्या कल्चरमधला-स्वभावातला फरक आहे.

मी इंग्लंडमध्ये आणखी एक गोष्ट शिकलो ती म्हणजे दिलेला शब्द पाळणं. तेथे आय वील कम म्हटलं म्हणजे तो त्यावेळी येणारच. आपल्याकडे कसं असतं, येणार म्हणून सांगितलं की वेळ उलटून गेली तरी पत्ता नसतो. माझ्या वडिलांनी मला सांगितलं होतं, 'स्वप्नात दिलेला शब्दसुद्धा पाळावा असं आपलं कल्चर आहे. निदान तू एक करत जा की जागेपणी दिलेला शब्द पाळत जा.' हे मात्र आपल्याकडे दिसत नाही.

इंग्लंडमध्ये नवीन हॉस्पिटलमध्ये गेलो तर तेथे ऑपरेशनसाठी कोणती इन्स्ट्रूमेंट मला लागतील, हँडग्लोव्हज्साठी माझ्या हाताचा साईज काय आहे, कपड्यांचं माप काय आहे हे सगळं पहिल्याच दिवशी लिहून ठेवलेलं असतं. आमच्याकडे असं दिसत नाही. याला म्हणतात आराखडा, शिस्त. काळा रंग म्हणून मला कधी त्रास झाला नाही.

*वीरकर – आपल्या पुस्तकात आपण उल्लेख केला आहे की आपण सामान्य विद्यार्थी होता आणि तोतरेपणाचा न्यूनगंड होता. हे दोन इंफिरीऑरिटी कॉम्प्ले स असूनही त्याचा काही परिणाम न होता आपण इतकं यश मिळवलंत त्याला काय कारण?*

*डॉ. श्रीखंडे* – खूप कारणं आहे. मुख्य कारण आहे आमच्या घरचं वातावरण. माझा मोठा भाऊ नेहमी पहिला नंबर मिळवत असे. पण माझ्या आईवडिलांनी आम्हा भावांमध्ये कधी तुलना केली नाही. माझ्या दोषांबद्दल कधी बोलले नाहीत. माझ्या चांगल्या गोष्टींबद्दल बोलायचे म्हणजे, हा गोट्या किती चांगला खेळतो, ड्राईंग कसं चांगलं काढतो, वगैरे वगैरे. आता आपण चाईल्ड सायकॉलॉजी म्हणतो पण अगदी कमी शिकलेले माझे आईवडील कोणताही अभ्यास न करता 'दे हॅव व्हीजन इन लाईफ.' मला वाटतं जास्त शिक्षण झालं की शहाणपण कमी होतं. असाच एक किस्सा सांगतो. १९०१ च्या सुमारास माझे काका दोन-तीन वर्षांचे असताना त्यांचा हर्निया अडकला होता. डॉ टरांनी प्रयत्न करून पाहिले आणि शेवटी म्हणाले, ''काही करता येणार नाही. मला या बाळाचं वाईट वाटतं पण काय करणार वुई हॅव टू ॲ सेप्ट.'' माझ्या काकांची आई अशिक्षित होती बट शी हॅज अ ट्रीमेन्डस् विस्डम. तिने बाळाला हातात घेतले आणि डोके खाली करून वर धरले. हळुहळू तो हार्निया आत गेला. नंतर ते काका पंढरपूरमध्ये मोठे डॉ टर झाले आणि वयाच्या ब्याऐंशीव्या वर्षी गेले. मला वाटतं, कॉमनसेन्स अँड विस्डम इज नॉट रीलेटेड टू एज्युकेशन, इज नॉट रीलेटेड टू इंटेलिजन्स अँड स्मार्टनेस, इट इज रीलेटेड टू युवर डिझायर टू हेल्प समबडी. माझी कधीही कोणाशीही कॉम्पिटिशन नव्हती. त्यामुळे मी सुखी होतो. अभ्यासाचा स्ट्रेस नव्हता. रोज आपण आपल्यात काहीतरी सुधारणा करत राहिले पाहिजे. आपल्याला अजून काय वाटतं हे कळलं पाहिजे. जगाला तुमच्याविषयी काय वाटतं हे इममटेरीयल आहे. एकदा हे कळलं की मग आपणच आपल्या विचारात-आचारात ॲ शनमधून सुधारणा करायला लागतो. सुधारणा व्हायला सुरुवात होते.

*वीरकर – आपण किती सुंदर विचार दिलात हा! हार्नियाचा विषय निघालाच आहे तर आपण माजी राष्ट्रपती शंकरदयाळ शर्मा यांचे ऑपरेशन केलं त्याबद्दल आम्हाला ऐकायला आवडेल.*

*डॉ. श्रीखंडे* – १९४८ च्या सुमारास राजभवनातून मला फोन आला. 'शंकरदयाळजी आलेले आहेत. त्यांना त्रास होत आहे. तुम्ही यावे.' मी त्याप्रमाणे गेलो. त्यांना तपासलं.

माझा माझ्या डोळ्यांवर विश्वासच बसेना. हार्निया म्हणजे पोटातील आतडी स्नायू फाटल्यामुळे बाहेर येतात. हळुहळू हा हार्निया मोठा होत जातो. मी त्यांना म्हटलं, ''साहेब, इत या वर्षांत ऑपरेशन का करून घेतलं नाही?'' ते म्हणाले, ''मी वीस वर्षांपूर्वी ऑपरेशन करून घेतले होते. अतोनात हाल झाले माझे. दुर्दैवाने जखमेत पू झाला. तेव्हापासून शस्त्रक्रिया करून घ्यायला मला भीती वाटते.'' मला वाटलं, भारतातील एक राज्याचे गव्हर्नर. एकेकाळीचे युपीचे मुख्यमंत्री, काँग्रेसचे नेते असलेल्या ह्या व्य तीला शस्त्रक्रिया करून घ्यायला भीती वाटते! अशीच दोन-तीन वर्षं गेली.

त्यांच्या धाकट्या भावानं मुंबईत ऑपरेशन करून घेतलं होतं. पण ते हार्नियाचं नव्हतं. ते भाऊ म्हणाले, ''डॉ. श्रीखंडे इज अ गुड डॉ टर, पण त्यांना हार्नियाबद्दल काही माहिती नाही. त्याचं कारण खरं असं होतं की राष्ट्राध्यक्षांजवळ त्यांच्या ठरावीक डॉ टरांपेक्षा वेगळा डॉ टर येऊ द्यायचा नाही. म्हणून शेवटी त्यांना अमेरिकेत न्यायचं ठरवलं. मी त्यांना म्हटलं, ''तुम्ही एवढा मोठा हार्निया घेऊन परदेशात गेलात तर ते लोक तुम्हाला आणि आम्हाला काय म्हणतील?''

शेवटी ऑपरेशन इकडेच करायचं ठरवलं. दिल्लीहून मला फोन आला. 'या आमच्याकडे. मी दिल्लीच्या विमानतळावर उतरलो आणि मला व्हीआयपी ट्रीटमेंट मिळू लागली. आम्हाला नेण्यासाठी गाडी आली होती. एक गाडी माझ्यासाठी, दुसरी गाडी माझ्या बॅगेसाठी. गेल्यावर तेथे माझा आदरसत्कार झाला. आर्मी हॉस्पिटलमध्ये ऑपरेशन करायचं ठरवलं. जेवण वगैरे झालं. माझ्यासाठी खास श्रीखंड केलं होतं. जेवणानंतर दोन तास झोपावं असा मी विचार केला पण मला झोप येईना. मोठी गार्डन, हातात गन घेतलेले पहारेकरी, सगळीकडे शांतता. सगळी व्हीआयपी वागणूक. मला प्रेसिडेंटचं ऑपरेशन करण्यासाठी मला आमंत्रित केलं होतं. मला आमचं जुनं घर आठवू लागलं. त्या घरात दिवे नव्हते. संडास नव्हते आणि आज कुठे आलोय मी! या सगळ्या विचारांनी मला झोप येईना.

ऑपरेशनचा दिवस ठरला. ३ एप्रिल १९९४ ला रात्री मी त्यांना ॲडमिट केलं. त्यावेळी शर्मांनी मला विचारलं, ''मि. श्रीखंडे, आय वॉंट टू आस्क यू वन वेश्चन. आय हॅव कन्सल्टेड मेनी सर्जन इन अमेरिका, इंग्लंड अँड हिअर अल्सो. हाऊ इज इट युवर ॲडव्हाईज इज डिफरंट फ्रॉम दॅट डे दे हॅव गिव्हन मी.'' म्हणजे हे कसं झालं की लग्नाचा मुहूर्त ठरला आणि आता विचारतायत की ही मुलगी माझ्यासाठी का ठरली? असं विचारावं तसं वाटलं मला.

मी तिथे सगळ्या इन्स्ट्र शन दिल्या. विचार केला, आता छान झोपावं. उद्या आपल्याला महत्त्वाचं ऑपरेशन करायचं आहे. मी शर्मांना उत्तर दिलं होतं की सर, आय हॅव टेकन अ करे ट डिसिजन. रात्री झोपायला गेलो आणि तेथे मला काहीतरी चावलं. लाईट लावून बघितलं तर तो उंदीर होता. हाताला र त आलं नव्हतं. मनात शंका आली की ऑपरेशन करावं की न करावं? ही शुभ घटना आहे की वाईट? मग म्हटलं, माझं नाव विनायक आहे आणि विनायकाचं वाहन आहे उंदीर. द वे यू लुक ॲट दी प्रॉब्लेम इज अ मेन प्रॉब्लेम इन लाईफ. हाऊ कॅन आय कॅन्सल दी ऑपरेशन? मी ऑपरेशन करायचं ठरवलं.

दुसऱ्या दिवशी ऑपरेशन करण्यासाठी गेलो तेव्हा तेथे सर्वांना आश्चर्य वाटलं, ''हाऊ कॅन यू डू दी ऑपरेशन विदाऊट ॲनस्थेशिया?'' माझ्या मनाचा गोंधळ उडाला पण मला खात्री होती की आय कॅन डू इट.

*वीरकर - राष्ट्रपतींवर ऑपरेशन करताना काही टेन्शन होतं? हा समोरचा पेशंट राष्ट्रपती आहे वगैरे वगैरे?*

श्रीखंडे - तेवढाच भाग बधिर करून ऑपरेशन करायचं होतं. रोगी कोण आहे, कसा आहे हा विचार मी नेहमीच दूर ठेवतो. मी आणि रोग एवढाच माझा संबंध असतो. मी त्यांना सांगितलं, ''सर, डोण्ट वरी. आय ॲम हिअर. आय हॅव टू मेक यू ऑल राईट. धीस इज नॉअ प्रॉब्लेम फॉर मी.'' शस्त्रक्रिया करायला तीन तास लागले. ऑपरेशन थिएटरमधून बाहेर आलो. त्यांच्या पत्नी, मुलं, सुना बाहेर होत्या. मी त्यांना म्हटलं, ''आय हॅव स सीडेड माय जॉब, पेढे वाटा.'' हा अनुभव अफाट आणि वेगळा आहे.

इंग्लंडमध्ये मला काही जण विचारत, तुम्ही एवढं दोनदा एफ.आर.सी.एफ. केलं. आता तुम्हाला भारतात परत का जायचं आहे? मी त्यांना गंमतीने सांगत असे. ''ब्रिटिश राजघराण्यातील राजकन्या ऑर्डिनरी माणसाशी विवाह करू इच्छित होत्या. मी अगदी ऑर्डिनरी असल्यामुळे आय ॲम ऑन हीट लिस्ट. दुसरं असं की मला इथली हवा आवडत नाही. इथे मला बटाटेवडे, शिरा खायला मिळत नाही. दॅट इज माय कंट्री. इंग्लंडचा राजा किंवा राणी मला ट्रीटमेंटसाठी बोलवणार नाहीत.'' त्यांनी विचारलं, ''भारताचा प्रेसिडेंट तुम्हाला ऑपरेशन करायला बोलावतील?'' मी म्हटलं, ''हू नोज?'' आणि आज खरोखरीच मी भारताच्या प्रेसिडेंटचं ऑपरेशन केलं होतं. नंतर नरसिंहराव भेटायला आले. व्हाईस प्रेसिडेंट आले. गप्पा मारल्या. हे सगळंच मला स्वप्नवत वाटत होतं.

*वीरकर - पित्ताशयाचं ऑपरेशन आपण वेगळ्या पद्धतीनं केलंत त्याविषयी सांगावं.*

श्रीखंडे - पित्ताशय म्हणजे लिव्हरमध्ये पित्त तयार होतं. बारीक बारीक नलिकांमधून ते पित्त आणलं जातं. पित्ताच्या ट्यूबमधून ते पित्त आतड्यात आणलं जातं. जेव्हा पोटात, जठरात अन्न नसतं तेव्हा पित्ताची गरज नसते म्हणून जे पित्त साठवलं जातं. ब्लड गॅडरमध्ये जेवण केल्यावर ते पित्त आत जातं. पित्ताच्या आतल्या पित्तनलिकांना ध का लागला तर ते धोकादायक असतं. माणसाचा प्राणसुद्धा जाऊ शकतो. विन्सेन्ट चर्चिलच्या जावयाच्या पित्ताच्या नलिका डॅमेज झाल्या होत्या. त्यांच्यावर दोन ऑपरेशन्स केली पण ही डाइड. ते वाचू शकले नाहीत.

पुस्तकातून आम्हाला काय शिकवलं

जातं की आतल्या नलिका आधी साफ करा आणि मग बाहेर या. हे स्टॅन्डर्ड टिचिंग जगभर असंच होतं.

१९६० साली मी एक ऑपरेशन करत होतो. तिथे जी नर्स होती तिचे वडील माँटेनिअर होते. त्यांचं नाव ग्रेगरी. ते २९ मे १९५३ मध्ये माऊंट एव्हरेस्टवर जायला निघाले. तीनशे फुटापर्यंत जाऊन परत आले. मला त्यांना भेटायचं होते पण त्याआधी मी गिर्यारोहणावरची तीन पुस्तके वाचली. नाहीतर मी काय बोलणार त्यांच्याशी? जेमतेम सिंहगड चढलेला माणूस मी! त्या पुस्तकातून आणि त्यांच्याशी बोलण्यातून मला एक संदेश मिळाला की गुड माँटेनिअर इज वन हू नेव्हर क्रॉस द पॉईंट फ्रॅम व्हेअर ही नो रिटर्न म्हणजे जा पुढे मागे या पण डोण्ट गो व्हेअर यू कॅनॉट कम बॅक. गो फ्रॉम नोन टू अननोन, सिम्पल टू डिफिकल्ट. डू दी इमकम्प्लीट ऑपरेशन टू कीप हिम अलाईव्ह दॅन डू द कम्प्लीट ऑपरेशन टू कील हिम. गो अॅ सेसेबल टू इन अॅ सेसेबल. मी पंचवीस वर्षे असं काम करत गेलो. पुस्तकात नाही ते खोटं आहे असं मानणाऱ्या लोकांना हे पटलं नाही. हे आपलं दुर्दैव आहे. राईट युअर ओन बुक वुईथ युवर ए सपिरीयन्स.

*वीरकर – शिकाऊ डॉ टरांना तुम्ही ही ऑपरेशन कशी करावीत ते शिकवलंत. त्यांना व्याख्यानं दिलीत पण त्यावेळी तुम्ही ठरावीक अभ्यासक्रमाप्रमाणे गेला नाहीत. तुम्ही त्यांना प्रत्यक्ष ज्ञान दिलंत आणि तेही रंजक पद्धतीनं शिकवलंत. हे तुम्ही कसं करू शकलात?*

डॉ. श्रीखंडे – अॅन अॅवरेज स्टुडंट बीकमस् अ गुड टीचर!

इंग्लंडमध्ये अनपेक्षितपणे आय पास्ड एफ.आर.सी.एस. बोथ विदाऊट अ फेल्युअर. म्हणजे जो मुलगा इथे सामान्य विद्यार्थी होता तो इंग्लंडमध्ये ब्रिलियंट स्टुडंट झाला. त्यानंतर १३ जून १९५९ पासून मी जॉब करू लागलो. पहिल्याच दिवशी माझे बॉस म्हणाले, ''मि. श्रीखंडे, यु हॅव डन गुड एफ.आर.सी.एस. काँग्रॅच्युलेशन्स! डू वन थिंग, देअर इज अ पेशंट इन वॉर्ड इज वेटिंग फॉर ऑपरेशन. अवर चीफ हॅव गॉन टू ग्रीस. सो यू मॅनेज द केस.'' तोपर्यंत मी दोन ऑपरेशन्स पाहिली होती. त्यापैकी एक पेशंट मृत्यू पावला होता. मी नव्हती केली ती ऑपरेशन्स, पण माझ्या अनुभवामध्ये पन्नास ट के मृत्यू होता.

मी पहिल्या दिवशी वॉर्डमध्ये गेलो. मला ऐकू आलं, ''आर यू मि. श्रीखंडे? ग्लॅड टू मीट यू. आय बिलीव यू आर अ ब्रिलियंट स्टुडंट. आय अॅम सेफ इन युवर हॅंडस्'' तिनं माझ्यावर इतका विश्वास दाखवला होता. मी म्हटलं, ''आय वील मेक यू ऑल राईट.'' रात्री रूमवर आलो. पुस्तकं काढली. कसं ऑपरेशन करायचं, कुठे अपघात टाळायचा. तो इंग्लंडच्या हॉस्पिटलमधील माझा पहिला दिवस होता. मला सगळंच नवीन होतं. ऑपरेशन वॉज न्यू, नर्स वॉज न्यू, अॅनेस्थेशिस्ट, पेशंट अल्सो न्यू, अॅन्ड आय अॅम अल्सो न्यू.

दुसऱ्या दिवशी ऑपरेशन केलं. अडीच तासात ऑपरेशन झालं. पेशंट ठीक झाला. मग मी त्यांना सांगितलं, ''धीसीज माय फर्स्ट ऑपरेशन'' त्यांना खरं वाटलं नाही. पण त्यांना कळलं धीसीज अ ऑनेस्ट मॅन.

जे पुस्तकात शिकायला मिळत नाही ते अनुभवातून शिकता येतं. गट फिलिंगचा मला ऑपरेशन करताना फार उपयोग झाला. काम केल्याशिवाय अनुभव येत नाही.

*वीरकर – आपण शिकाऊ डॉ टरांना शिकवलं, तसं हुशार विद्यार्थ्यांनाही शिकवलंत. त्याबद्दलचे अनुभव सांगावे.*

श्रीखंडे – गुड टीचर मस्ट कम टू द लेव्हल ऑफ स्टुडंटस्. मी अॅव्हरेज स्टुडंट असल्यामुळे मला विद्यार्थ्यांचे प्रॉब्लेम समजायचे. आम्हाला विद्यार्थ्यांना ए झांपलमधून सांगायला आवडायचं.

मी बॉम्बे हॉस्पिटलमध्ये राऊंड घेत असताना मला एक उंच मुलगी भेटली. म्हणाली, ''आय अॅम युवर स्टुडंट.'' मी विचारलं, ''काय करतेस आता?'' ती म्हणाली, ''मी आता अमेरिकेत असते. आय वॉज नॉट गेटींग अ पोस्ट. कधी इकडे काम कर, कधी तिकडे काम कर असं चाललं होतं. मी वीस वर्षांपूर्वी मी तुमच्याकडे शिकले. एका ठिकाणी एक पेशंट आला होता. युरीन पास होत नव्हती म्हणून तो रेस्टलेस होता. तिथल्या दोन अमेरिकन डॉ टरांनी कॅथेड्रल पास करण्याचा प्रयत्न केला पण त्यांना ते जमलं नाही. तेव्हा मला तुमचं लिनिक आठवलं. व्हॉट दे वेअर डुइंग वॉज रॉंग. तो पेशंट येतो कसा, झोपतो कसा, त्याला पाय लांब करता येत नाहीत. त्याला उगाचच प्रश्न विचारायचे नाहीत. फर्स्ट जॉब इज टू अेम्टी हिज ब्लॅडर. नंतर त्या मुलीने कॅथेड्रीलविषयीही सांगितलं. त्या पेशंटला बरं वाटलं. तो पेशंट एका बिझिनेसचा ट्रस्टी होता. त्यानं त्या मुलीला चांगला जॉब दिला. असे लहानसहान प्रसंग घडत असतात त्यातून कधी आयुष्याला वेगळंच वळण मिळतं.

*वीरकर – 'फायनल डायग्नोसीस' अशी एक कादंबरी आहे. त्या पुस्तकात, एक जुन्या पठडीतील डॉ टर नवीन तत्त्वज्ञान आत्मसात करायला नकार देतो आणि त्यामुळे संपूर्ण हॉस्पिटलला संसर्गजन्य रोगांनी ग्रासलं जातं. तुमच्या बाबतीत असं दिसून आलं आहे की नवीन तंत्रज्ञान आत्मसात करणं, स्वत: शिकून ते आपल्या शिष्यांना शिकवणं, कटींगेज टे नॉलॉजीबरोबर कायम राहणं. इंडोस्कोपी किंवा लॅप्रोस्कोपी या टे नॉलॉजीचा अंगीकार करणं ही तंत्रज्ञानं आपण अंगी–कारलीत. त्याबद्दलही आपण सांगितलंत तर आम्हाला आवडेल.*

डॉ. श्रीखंडे – या जगात जिवंत राहायचं असेल तर यू मस्ट कीप इट टाईटस्. गेल्या तीन वर्षांत इतके तुफान बदल सुरू आहेत. एक किस्सा सांगतो. १९७१ मध्ये मी एकाचं ऑपरेशन केलं. त्याची पित्ताची नलिका लाल झाली होती. किचकट ऑपरेशन होतं. सहा–सात तास लागले ऑपरेशनला. ते पेशंट बरे झाले. चार महिन्यानंतर पुन्हा आले आणि म्हणाले, माझ्या मुलाला स्टोन झालाय आणि

तुम्ही अशी ऑपरेशन्स करता हे आम्हाला माहिती आहे. म्हणजे स्पेशयलाझेशन हॅज कम. असा सगळा चेंज इत या वेगानं होत आहे आणि आपण तो अॅ सेप्ट केलाच पाहिजे.

*वीरकर – ऑनेस्टी आणि इंटिग्रिटी आपण कायम राखलीत. 'कट प्रॅ टिस'बद्दल ' लोरोफॉर्म' पुस्तकात लिहिलं गेलं. आपण या कट प्रॅ टिसला पूर्णपणे टाळून, आपण खरं काय ते पेशंटला सांगून प्रामाणिकपणे व्यवसाय केला. त्यात आपण इतके यशस्वी कसे झालात?*

डॉ. श्रीखंडे – १९२४ मध्ये मी शिकागोमध्ये अभ्यास करताना असं वाचलं होतं, की डॉ टरांच्या नातेवाईकांची अॅपेंडि सची, टॉन्सिलची, युटेरसची ऑपरेशन्स होत नाहीत. म्हणजेच त्यांची अनावश्यक ऑपरेशन्स होत नाहीत. माणसाच्या मनातील हाय करप्शनची वृत्ती याला कारणीभूत आहे. फ त प्रथा बदलल्या. पूर्वी आंब्याच्या पेट्या पाठवत. आता व्हिस्कीच्या बाटल्या पाठवतात. पैसे देऊन काम करायचं ही वृत्ती सगळ्यांमध्ये असते. कट प्रॅ टिस जगभर आहे. पण दुसऱ्यावर टीका न करता, कट प्रॅ टिस न करता यशस्वी होता येतं हे मी ठरवलं होतं. प्रत्येक विमानात लॅक बॉ स असते. त्यात त्या विमानाचा, फ्लाईटचा इतिहास असतो. अशीच एक बॉ स आपल्या मनात असते. ती व्हाईट असो किंवा ब्लॅक असो. इट डिपेंडस् ऑन व्हाईट डीडस् ऑर ब्लॅक डीडस्. ब्लॅक बॉ स बोलायला लागली की, 'श्रीखंडे, तू काल अशी अशी ऑपरेशन्स केली आहेस. मग झोप येत नाही, अॅसिडिटी वाढते, अनइझी वाटतं. हे सगळं रॉंग माईंडमुळे निर्माण होतं.' एकजण मला म्हणाला होता, ''श्रीखंडे, इफ यू रीमेन ऑनेस्ट लाईक धीस, यू वील बी स्टार.'' मी म्हटलं, ''स्टार होणं श य नाही आपल्याला. मग मी इंग्लंडला परत गेलो. बेळगावला गेलो कुठेही गेलो तरी!''

शेवटी एक सांगतो तुम्हाला. साखरेचा एक कण ठेवलात तरी मुंग्या येतातच. एकदा हैदराबादला गेलो होतो. तिथली राहण्याची जागा साफ केली आणि साखरेचा एक खडा ठेवला. लगेच एक मुंगी आली, दुसरी आली, तिसरी आली. पाच मिनिटात मुंग्यांची रांग लागली. तसंच आहे हे. पेशंट येतातच. आधी एक पेशंट येतो. मग हळुहळू आणखी पेशंट यायला लागतात. वेळ लागतो, थांबावं लागतं. एक किस्सा सांगतो. एका वीस वर्षाच्या मुलीला थॉयराईड ग्रंथींचा त्रास होत होता पण अँटीथायराईड ड्रग्ज घेऊनही तिला बरं वाटत नव्हतं. एका डॉ टरनं तिला माझ्याकडे पाठवलं. इथे काहीतरी गोंधळ होता असं मला वाटलं. मी तिला म्हटलं मला हार्ट चेक करून बघावं लागेल. तिचे वडील म्हणाले, ''नो सर, शी वुड नॉट शो ब्रेस्ट टू यू.'' मग मी म्हटलं, ''मग टेक हर अवे. आय मस्ट ए झाम हर हार्ट.'' मी तपासलं तेव्हा लक्षात आलं. धीस लेडी हॅज मायक्रोसोनोसीस. तिथला व्हॉल्व लाल झाला होता. म्हणजेच सिमटम्स् हार्टमध्ये होते, थॉयराईड ग्लॅडमध्ये नव्हते. ऑपरेशनची गरज नव्हती. ती बाई परत गेली. त्या डॉ टरला आश्चर्य वाटलं की जे या सर्जननं निदान केलं ते आपण करू शकलो नाही. नंतर त्या डॉ टरने माझ्याकडे अनेक पेशंट पाठवले. एक मुंगी आली की हळुहळू आणखी मुंग्या येऊ लागतात. थांबावं लागतं.

*वीरकर – आपण मुंबईत आलात तेव्हा आपल्याकडे काही वारसा नव्हता. म्हणजे डॉ टरांचीही घराणी असतात. वडील, मुलगा, सून हे सगळे डॉ टर असतात. तसं काही नसताना तुम्ही इतकं यश कसं मिळवलंत?*

श्रीखंडे – यू हॅव टू इन्व्हॉल्व इन युवर वर्क. आपलं काम उत्तम हवं. पेशंटशी बोललं पाहिजे. इंटिग्रीटी अँड कॉन्फिडन्स या दोन्ही गोष्टी हव्यात. हातात स्कील असलं की एक प्रकारचा माज चढतो की आय कॅन डू इट म्हणून इंटिग्रीटी आणि आत्मविश्वास या दोन्हीही गोष्टी डॉ टरकडे असायला हव्यात. फार लवकर श्रीमंत होणारा डॉ टर ऑनेस्ट असणं श यच नाही. या देशात ऐंशी ट के गरीब लोक राहतात.

*वीरकर – आपण मनाची श्रीमंती मिळवलीत. गुडवीलही मिळवलंत. हे फार महत्त्वाचं आहे. तुम्ही नेहमी म्हणता की, तुमच्याबरोबर काम करणारी नर्स आणि अॅनेस्थेटिस्ट यांचं कामही फार महत्त्वाचं असतं. हे टीमवर्क कसं असतं याबद्दलही सांगावं.*

श्रीखंडे – सर्वच क्षेत्रांत टीमवर्क लागतं. अॅनेस्थेशिया हा अतिशय महत्त्वाचा आहे. हे टीमवर्क आपण टिकवावं लागतं. अ लीडर ऑफ द टीम मस्ट हॅव इंटिग्रीटी, व्हिजन कन्सर्न आणि महत्त्वाचं म्हणजे ट्राय टू अॅबसॉर्ब द मिस्टेक ऑफ युवर टीम.

*वीरकर – ऑपरेशनची रूम कशी असावी याबद्दल आपण जागरूक असता. आपली ऑपरेशन रूम केली की त्यातून बाहेरचा व्ह्यू दिसू शकतो. संगीताच्या वातावरणात आपली ऑपरेशन्स चालतात. श्रीखंडे लिनिकमध्ये आपण हे वेगळेपण आणलं आहे. त्यामुळे खूप लोक आपल्या संपर्कात आले. त्यात कुसुमाग्रज आहेत, व्ही. शांताराम आहेत अशांची एखादी हृदयस्पर्शी आठवण सांगता?*

डॉ. श्रीखंडे – चाळीस वर्षांपूर्वी कुसुमाग्रजांच्या पत्नीला कॅन्सर झाला होता. मी त्यांना पाहिलं तेव्हा लक्षात आलं की खूपच पुढच्या स्टेजला गेलेला आहे. त्यात औषध देऊन उगाच त्रास देण्यास अर्थ नाही. मी त्यांना तसं सांगितलं. त्यांनी खिशात हात घातला विचारलं, 'फी किती?' मी म्हटलं, 'तुमची एक कविता 'गर्जा जयजयकार क्रांतीचा' या कवितेनं साऱ्या महाराष्ट्राला वेड लावलं. तुमच्याकडून मी फी घेईन का? उलट, आम्ही नेहमी तुमच्याशी कृतज्ञ राहू.' तात्यासाहेबांच्या डोळ्यांत पाणी आले.

त्यानंतर काही दिवसांनी मी, रामदास, शशी मेहता आणि मोहन वाघ त्यांच्या वाढदिवसाला गेलो होतो. त्यानंतर आमच्यात छान मैत्री झाली. त्यांच्या मृत्यूपूर्वी दोन दिवस आधी आम्ही त्यांना भेटायला गेलो होतो. रात्रभर मी त्यांच्याबरोबर राहिलो. तो दिवस होता आठ मार्च. माझ्या वाढदिवसानिमित्त

त्यांनी माझ्या अंगावर शाल घातली. मला एक स्टॅच्यू दिला. एक पुस्तक दिलं. म्हणाले, 'इटीज ट्रान्सलेटेड इन इंग्लिश, पण मी त्यावर सही करू शकत नाही.' त्यांनी मला एक पुष्पगुच्छ दिला आणि मिठी मारली. मी अजूनही ती मिठी विसरू शकत नाही. आम्ही परत यायला निघालो तेव्हा त्यांचे मित्र म्हणाले, 'श्रीखंडे तात्यासाहेब म्हणताहेत आता आमची जायची वेळ आली.'

मी त्यांना म्हटलं, 'प्रत्येकालाच एक ना एक दिवस जायचं आहे. पण एक करा, पुढच्या वर्षी २७ फेब्रुवारी आपण एकमेकांना भेटू.' त्यानंतर ते गेलेच.

*वीरकर - मृत्यूचा विषय आलाच आहे म्हणून विचारतो, डॉ टरांना पेशंटचा मृत्यू कधी कधी समोर पाहावा लागतो. त्यावेळी डॉ टरांनी कसं रिॲ ट व्हावं?*

डॉ. श्रीखंडे - डॉ टरनं सेन्सिबल असावं पण सेन्सिटिव्ह नसावं. लोकांच्या भावना कळल्या पाहिजेत. सेन्सिटिव्ह झालो तर वाईजली काम करणं कठीण जातं. दुसरं असं, की एखाद्या असाध्य रोगावर शस्त्रक्रिया करताना मृत्यू आला तर तितकंसं काही वाटत नाही. पण अनपेक्षितपणे चांगली प्रकृती असताना, ऑपरेशन करताना मृत्यू आला तर फार दु:ख वाटतं. तिथे आमचा कस लागतो. म्हणून प्रत्येक ऑपरेशन काळजी-पूर्वकच करावं लागतं. एव्हरी फ्लाईट इज अ रीस्क. समथिंग कॅन बी रॉंग.

*वीरकर - रुग्णांशी त्याच्या नावानं बोलायचं आणि त्याच्या रोगाबद्दलही बोलायचं, चर्चा करायची असा एक श्रीखंडे पॅटर्न आला. त्याच्यामुळे काय फायदा झाला?*

श्रीखंडे - प्रत्येक माणसाला नाव असतं. त्या नावानं त्याच्याशी बोललं म्हणजे पेशंटला बरं वाटतं. त्याला काही फार प्रयत्न करावे लागत नाहीत. पेशंटचा डॉ टरवरील विश्वास ही फार महत्त्वाची गोष्ट असते आणि त्या विश्वासाच्या जोरावर पेशंट आनंदी राहतो. एकदा एक नागपूरचा पेशंट आला होता. त्याला दहा-पंधरा वेळा परसाकडे व्हायचं आणि त्यातून र त जायचं. मी त्याला विचारलं, 'तुम्ही इत या लांबून इकडे का आलात?' मी त्याच्याकडून दोन-चार गोष्टी करून घेतल्या. सात दिवसांनी तो परत आला. आता तो बरा झाला होता. तो म्हणाला, 'डॉ टर, तुम्ही त्या दिवशी मला विचारलात. इत या लांबून तुम्ही का आलात? तुम्ही माझ्या मित्राचा असा रोग बरा केला होतात म्हणून मी मुद्दाम तुमच्याकडे आलो आणि तुम्हाला खोटं वाटेल, तुम्ही त्या दिवशी माझ्या पोटावर हात ठेवलात तेव्हापासूनच मला बरं वाटायला लागलं.' पेशंटचा डॉ टरांवरील विश्वास ही फार महत्त्वाची गोष्ट आहे आणि ते कुठे शिकवलं जात नाही. माणसानं माणसाशी कसं वागावं हे कॉलेजात शिकवलं जात नाही. कॉलेजात शिकवतात फ त सायन्स. डॉ टरमधील 'माणूस' फार महत्त्वाचा आहे. आता रिमोट कंट्रोलवर सगळं मेडिसीन देणं चाललं आहे.

मी जर्मनीत माझ्या एका मित्राकडे जेवायला गेलो होतो. तो म्हणाला, माझी पत्नी गेले दोन वर्षे आजारी आहे. मी तिच्याशी चर्चा केली, काही नोटस् तयार केल्या. तिचं पोट तपासलं. तेव्हा ती म्हणाली, 'डॉ टर, यू आर फर्स्ट मॅन हू टच्ड माय स्टमक. जेव्हा मी जर्मनीत डॉ टरांकडे गेले तेव्हा तेथे एक नर्स कॉम्प्युटरसमोर बसलेली होती. तिनं माझं नाव, पत्ता, सगळी माहिती कॉम्प्युटरवर घातली. नंतर तो पेपर इन्व्हेस्टिगेशनसाठी लॅबोरॅटरीत गेला. नंतर ब्लडचा कॉम्प्युटराइज रिपोर्ट डॉ टरकडे गेला. डॉ टरनं तिला काही प्रश्न विचारले आणि मला घरी जायला सांगितले. त्या डॉ टरांनी मला तपासलेच नाही.' मेडिसीन म्हणजे एक ह्युमन कन्झ्युमर बेस्ड झालं आहे.

*वीरकर - आता आपण श्रीखंडे लिनिकबद्दल सांगावं. छोटं असेल, पण वैद्यकीय उपचार आणि आपुलकी इथं गेली तेहेतीस वर्षं मिळत आहे.*

डॉ. श्रीखंडे - मी इंग्लंडहून परत आलो तेव्हा मुंबईतील जी.टी.मध्ये काम केलं. विद्यार्थ्यांना शिकवलं. खूप गरीब पेशंट यायचे. ते लोक डॉ टरला भगवान मानतात. त्यानंतर फड यांच्या नर्सिंग होममध्ये तेरा वर्षं काम केलं. फड यांचं कामही वाढत होतं म्हणून स्वत:ची दुसरी जागा पाहायला हवी असा मी विचार केला. स्वत:च्या नर्सिंग होमसाठी मी काही पथ्यं पाळली. खोलीत शांतता आणि स्वच्छता हवी. आम्ही आमच्या नर्सिंग होममध्ये डिपॉझिट घेत नाही कारण पेशंटनं आपलं आयुष्यच इथे डिपॉझिट केलेलं असतं. मी रंग निवडले. ऑपरेशन थिएटर छान तयार केलं.

मिसेस बिर्ला म्हणाल्या, 'श्रीखंडे, युवर प्लेस इज सो ब्युटिफुल. आम्ही महाबळेश्वरला आहोत की काय असं वाटतं.' तपासण्या कमीत कमी कशा कराव्या यासाठी आम्ही प्रयत्नशील असतो. आम्ही आमच्या कामावर प्रेम करतो. चांगल्या, प्रामाणिक डॉ टरला फार श्रीमंत होता येत नाही.

*वीरकर - आपण वेगवेगळ्या गावांमध्ये गेलात. तिथल्या कॉन्फरन्स घेतल्यात. त्यांना ज्ञान देऊन त्यातून डॉ टरांची, सर्जनची परंपरा निर्माण झाली. अशा कॉन्फरन्समधून तुम्हाला काय अनुभव आले?*

डॉ. श्रीखंडे - पुष्कळ अनुभव आले. जेथे जातो तेथे लोक भेटतात, बोलतात, चर्चा करतात आणि माझे मित्र होतात. आयुष्यात काय दिसतंय, ते सगळं नाशवंत आहे. चांगल्या गोष्टीच राहणार आहेत. माणसांवर प्रेम आणि वस्तूंचा वापर हे सुखी जीवनाचं सूत्र आहे, पण वस्तूंवर प्रेम वाढतं आणि माणसांचा वापर केला जातो तेव्हा सगळंच बदलून जातं.

*वीरकर - डॉ. जी.एन. फडके पुरुष नसबंदीचे एक वेगळेच ऑपरेशन करू शकत, म्हणजे नसबंदी झाल्यानंतर ती नस पुन्हा जोडण्याचं ऑपरेशन होऊ शकतं हे त्यांनी सिद्ध करून दाखवलं होतं. त्यावेळी त्यांचं नाव जगात झालं होतं. नसबंदी झाल्यानंतर दुर्दैवानं त्या व्य तीचं आधीचं मूल गेलं तर ती नस पुन्हा जोडण्याची ऑपरेशन आपण केली आहेत त्याबद्दल माहिती सांगावी.*

डॉ. श्रीखंडे – डॉ. जी.एन. फडके १४ सप्टेंबर १९६४मध्ये गेले. ते अशा प्रकारची ऑपरेशन्स करत असत. त्यांचे असिस्टंट डॉ. शिंदे आणि त्यांचा थिएटरबॉय सखाराम मला म्हणाले, 'तुम्ही हे ऑपरेशन का नाही करत?' मी म्हटलं, 'मला करता येत नाही.' त्या थिएटर असिस्टंटनं मला हे ऑपरेशन कसं करायचं ते दाखवलं. त्यानंतर मी तशी असंख्य ऑपरेशन्स केली. आयुष्यात कुठल्याही घटनांवर आपला कंट्रोल नसतो, पण संधी मिळतात तेव्हा त्याचा उपयोग केला पाहिजे.

*वीरकर – आपण तत्त्वज्ञ डॉ टर आहात आणि ह्या क्षेत्रात द्रष्टे आहात असं म्हटलं जातं. हे द्रष्टेपण कसं मिळवलंत?*

डॉ. श्रीखंडे – डिफिकल्टीमधून आपण शिकत जातो. आयुष्यात फार सुखाच्या गोष्टी असू नयेत. डिफिकल्टी आल्या की आपण विचार करतो, त्यातून मार्ग काढतो. आयुष्यात अडचणी आल्या पाहिजेत. लहानवयात यश येता कामा नये आणि म्हातारपणी अपयश येता कामा नये. मी इंग्लंडमध्ये असताना माझा एक असिस्टंट होता. तो मला म्हणायचा, 'डॉ टर आर यू अ सर्जन, ऑर प्रीस्ट ऑर फिलॉसॉफर?' मी म्हणत असे, 'ऑल इन वन.' लाईफ आणि डेथ याच्यामधली लाईन अगदी थीन आहे. आपल्या देशात कोट्यवधी लोक आहेत. त्यांच्यासाठी काम करावं असं मला वाटतं. त्यातून मिळणारा आनंद हा निर्भेळ आनंद असतो. रोज अनेक लोक मला भेटतात, लांबून भेटायला येतात, नमस्कार करतात. व्हॉट अ गुड जॉब.

१९६७ साली मी जीटीमध्ये होतो तेव्हा एक ऑपरेशन केलं होतं. ती बाई उत्तर प्रदेशातल्या खेडेगावातून आली होती. ती पुन्हा काही वर्षांनी मुंबईला आली. जीटीमध्ये गेली. तिथे मी नाही हे कळल्यावर माझ्या लिनिकमध्ये आली–म्हणाली, 'साब, जरा तबियत देख लो.' विचार करा. चाळीस वर्षांनंतर एक अशिक्षित बाई माझी आठवण ठेवून आली. अशा वेळी वाटतं, 'धीस लाइफ इज अ फुल ऑफ जॉय.'

*वीरकर – मला वाटतं तुमच्या नावातच श्रीखंड आहे.*

डॉ. श्रीखंडे – आम्ही मूळचे गोव्याचे. तीनशे वर्षांपूर्वी तेथे धर्मांतर सुरू झालं. तेव्हा आमच्या मूळपुरुषानं आमच्या कुटुंबाला कोल्हापूरला पाठवलं त्यामुळे आम्ही धर्मांतरातून वाचलो. शिरखंडन झालं नाही म्हणून आमचं आडनाव झालं शिरखंडे. हळुहळू ते झालं श्रीखंडे. स्वत:चा मान ठेवणं फार महत्त्वाचं आहे. आमच्या मूळ पुरुषांची आणि पूर्वजांची ती जिद्द कुठेतरी माझ्यात आली असावी.

*वीरकर – आयुष्याच्या या वळणावर आपल्याला काय वाटतं? तुमच्या वडिलांनी तुम्हाला सांगितलं होतं, 'तू सामान्य माणसांचा असामान्य डॉ टर हो.' मागे वळून पाहताना तुम्हाला काय वाटतं?*

श्रीखंडे – ते म्हणत, 'तू चांगलं काम करत आहेस. माझ्या सांगण्याप्रमाणे वागतो आहेस. मी रोज तुझं नाव ऐकतो.' आई–वडिलांनी माझं चांगलं काम पाहिलं याबद्दल मला समाधान वाटतं. ज्यांनी घरात पावित्र्य पाहिलं आहे ना तो सहसा वाईट वळणावर जात नाही. हे संस्कार कॉलेजमध्ये होत नाहीत, सोसायटीत होत नाहीत, ते स्वत:च्या घरात होतात. मुलाच्या पहिल्या आठ वर्षांपर्यंत त्याच्यावर जे संस्कार होतात ते महत्त्वाचे आहेत.

*वीरकर – तुम्ही हे सगळं जे जाणीव–पूर्वक स्वीकारलं आहे. त्यात डेस्टिनी– प्रारब्ध असं काही असतं असं तुम्हाला वाटतं का? का प्रयत्नालाही जागा असते?*

डॉ. श्रीखंडे – प्रारब्ध असतंच पण आयुष्यात महत्त्वाची असते ती अनसर्टनटी. तुम्ही कितीही प्रयत्न करा एका क्षणात यू कॅन बी डिस्ट्रॉइड. उत्तम प्रयत्न करणं. मन आणि शरीर स्वच्छ ठेवणं ही प्रत्येकाचीच जबाबदारी आहे. माणसांनी माणसाशी कसं वागावं हे शिकवणं हे कॉम्प्युटरचं काम नाही. आईवडिलांचं, शिक्षकांचं काम आहे. 'अंधार फार झाला तरी पणती जपुनी ठेवा' आपण आशावादी राहावं. चुका दाखवणं सोपं आहे. टीका करणं, कुरकुर करणं सोपं आहे पण चांगला मार्ग दाखवणं हे आपलं काम आहे.

*वीरकर – मित्रहो, गेले दोन तास डॉ टरांचे विचार आपण ऐकतो आहोत. आपण खरोखरच मंत्रमुग्ध झालो आहोत. शरीर म्हटलं की व्याधी आली. व्याधी म्हटलं की वेदना आली. या वेदना सुसह्य करायच्या असतील तर वैद्यकशास्त्राकडे जाण्याशिवाय म्हणजेच डॉ टरकडे जाण्याशिवाय पर्याय नाही.*

श्रीखंडे लिनिकमधून गेली तेहेतीस वर्ष आपल्याला या व्यवसायातील पावित्र्य दिसतं. त्या आरोग्यमंदिरातून प्रेम मिळतं. मानवाचा हात हे माणसाला मिळालेलं वरदान आहे. अंगठ्यानं तो चारही बोटांना स्पर्श करू शकतो. या हातांनीच चाक बनवलं, कॉम्प्युटर बनवला, जीवनाला आकार दिला. हेच हात आणि बुद्धी एकत्र येऊन विधायक कार्य करतात आणि हेच हात एके ४७ सुद्धा बनवतात. हँडग्रेनेड, ॲटमबॉम्ब बनवतात. पण डॉ. श्रीखंडे यांच्यासारखे द्रष्टे डॉ टर या दोन हातांचा वापर करून कितीतरी जीव वाचवतात. इतर डॉ टरांना चांगलं वागण्याचं मार्गदर्शन करतात. आपलं ज्ञान शेकडो शिष्यांच्या रूपानं पुढील पिढीपर्यंत पोचवतात. कट प्रॅ टिस न करता एक सामान्य माणूस प्रामाणिकपणे काम करून किती असामान्य होऊ शकतो याचं हे उदाहरण आहे. फुललेल्या कृतार्थ जीवनाचं हे उदाहरण आहे.

डॉ टर, तुमच्याकडे पाहून असं वाटतं की आमच्यासारख्यांचे दोन हात आपल्या साफल्यपूर्ण जीवनाला नमस्कार करण्यासाठी आपोआप जोडले जातात.

---

शब्दांकन : **शर्मिला पिटकर**

**काही कारणास्तव मे आणि जून या दोन महिन्यांत 'कृतार्थ मुलाखतमाले'चा कार्यक्रम होणार नाही.**

# अभूतपूर्व क्षणांचे साक्षीदार

## कुमार नवाथे

मागील वर्षी एका दिवाळी अंकात मी 'लंडन पब-जुनी, इंग्लिश परंपरा' या विषयावर एक लेख लिहिला होता. त्याकरता पब या संस्थेच्या उगमापासूनचा इतिहास, त्याची स्थित्यंतरे त्यांचा विस्तार त्यातील प्रमुख टप्पे या गोष्टींच्या अनुषंगाने बरेच वाचन झाले. जुने जुने फोटो-चित्रे पाहावयास मिळाली. सरस आणि सुरस कथाही वाचावयास मिळाल्या.

त्याच वेळी युरोप कसा घडून गेला ही साधारण दोन हजार वर्षाची मालिका बघताना एक संदर्भ बाराव्या शतकातील घटनेचा आला. केंट परगण्यातील एक छोटेसे शांत खेडेगांव- कँटरबरी, एका दुर्घटनेमुळे जगाच्या नकाशावर आपले नाव कसे कोरून गेले याची ती कथा होती.

थॉमस बेकेट हा आर्चबिशप म्हणून ख्रिश्चन धर्मप्रसाराकरता कॅटरबरीमधील कॅथड्रलमध्ये नियु त झाला होता. राजसत्ता आणि धर्मसत्ता (पीठ) यांच्यात अधिकारा-वरून, वर्चस्वावरून वादविवाद होत होते. कधी ते उग्र रूपही धारण करायचे. दुसरा हेन्री हा त्यावेळी राजा होता. या वादविवादात थॉमस बेकेट व दुसरा हेन्री यांचे असेच तीव्र मतभेद झाले आणि त्याची परिणती राजाच्या पाठीराख्याकडून ११७० मध्यें थॉमस बेकेटची हत्या करण्यात झाली.

ही घटना घडली आणि बेकेटच्या भ तांनी, पाठीराख्यांनी आणि राजा विरोधी लोकांनीं बेकेटचे अंतिम दर्शन घेण्याकरता कँटरबरीकडे हजारोंनी कूच केले. त्याच्या पार्थिवावर अश्रू ढाळणाऱ्यांची संख्या आटो यात येण्याऐवजी दिवसेंदिवस वाढू लागली. छोट्याशा वस्तीच्या कँटरबारीला गर्दीचा महापूर सोसवेना. दर्शनाकरता दिवसदिवस वाट पाहावी लागू लागली. सर्व युरोपातून येणाऱ्या या लोकांनी राहायचे कुठे हा प्रश्न एवढा निकराचा झाला की मग त्यांच्या तात्पुरत्या निवासाकरता वसतिस्थाने जागो जागी कँटरबरीमध्यें उभी राहू लागली. जी Inns म्हणून प्रथम उदयाला आली. आज युरोपअमेरिकेसह जगभरात अमुक अमुक Inns म्हणून जी दिमाखाने उभी आहेत त्यांचा जन्म हा एकाच्या मृत्युमुळे झाला आहे. कँटरबरीमुळे इनस् वाढायला लागली.

याच बरोबर थॉमस बेकेटच्या निघृण हत्येमुळे युरोपातील लाखो दुःखित अनुयायांचे कँटरबरी हे श्रध्दास्थान बनले. ते एक धर्मक्षेत्र झाले. एकोणतीस डिसेंबर हा बेकेटचा निर्वाणदिन. दरवर्षी भ तिभावाने पूजला जाऊ लागला. पण सारे वर्षभर त्याच्या थडग्याला आणि कॅथड्रलला येणाऱ्यांची संख्या वाढती राहिली. कँटरबरीचे तीर्थक्षेत्र झाले. 'टाबार्ड इन' ही याच काळात उदयास आलेली निसर्गरम्य वस्तीची जागा. अनेक कलाकार लेखक कवी जेव्हा कँटरबरीला येत तेव्हा आवर्जून या टाबार्डमध्यें राहात. आपले लिखाण करत, अभ्यास करत. कॅथड्रल भेट हे जणू निमित्त असे. अनेक परिकथा लिहिणारा जेफ्री चाऊसर इथे राही. त्याला सुचलेल्या अनेक परिकथांचा जन्म या कँटरबरीमधील आहे.

असा अनोखा इतिहास असलेल्या संस्कृतिसंपन्न कँटरबरीला एकदा तरी जायलाच पाहिजे, थॉमस बेकेटची वास्तू पाहिली पाहिजे, ज्या साहित्यिकांना मोहवून टाकले त्या जागा, तळी रम्य परिसर पाहायला पाहिजे असं हे सगळं वाचत असतानाच मी ठरवून टाकलं आणि पुढे विसरूनही गेलो.

पण कँटरबरीचा योग माझ्या कुंडलीत होता. एका करता बाकी गोष्टी छान जमून आल्या. 'महाराष्ट्र भूषण' पुरस्काराने सन्मानित झालेल्या मंगेश पाडगावकरांचा सत्कार महाराष्ट्र मंडळ, लंडन यांनी आयोजित केला होता. त्यांचा सत्कार, काव्य वाचन, त्यांच्या कवितांवर आधारित गीत- गायनाचा कार्यक्रम अस त्या आठवडा- भराच्या दौऱ्याचे स्वरूप होते. हा सारा एक दिवसाचा कार्यक्रम, उरलेल्या दिवसांचे यथोचित आयोजन, लंडननिवासी व काळे ट्रस्ट या सेवाभावी स्थानिक संस्थेचे मुख्य विश्वस्त मुकुंद नवाथे यांनी कल्पकतेने केले होते. पाडगावकरांनी शे सपिअरच्या तीन नाटकांचे अनुवाद मराठीत केले आहेत, त्याच्या प्रती शे सपिअरच्या स्मारकाला भेट देणे हा एक, तर बायबलचे त्यांनी केलेले मराठी भाषांतर तेही प्रमुख चर्चला भेट देणे हा अजून एका दिवसाचा कार्यक्रम होता.

लंडनपासून सुमारे शंभर-सव्वाशे मैलांवर केंटमध्ये कँटरबरी हे छोटे गांव आहे. छोटे म्हणण्याचे कारण लंडनसारखी वर्दळ, गर्दी त्यामानाने कमी आहे. विस्तीर्ण मोकळ्या जागा, रम्य वनराई, खरंच प्रेमात पडावे असेच हे गाव आहे. गावात शिरताना दूरनच कँटरबरी कॅथॅड्रलचे मनोरे आपण जवळ आल्याची जाणीव करून देतात, पण ती बरीच फसवी असते. कारण त्या चर्चच्याच तटबंदीभोवती आम्ही किती वेळ तरी गरागरा फिरत होतो. ते सिध्दिविनायकाचे मंदिर असते तर अकरा प्रदक्षिणांचे पुण्य आमच्या पदरी पडल असते.

चर्चचा परिसर खूप मोठा आहे. जुन्या शिल्पाची आठवण करून देणाऱ्या साऱ्या आतील इमारती, वेगळ्या वेगळ्या बाजूने दिसणारे कळस, ख्रिस्त पुराणातील दृश्ये काढलेल्या उंचच उंच रंगीत काचा आणि

त्याच्या जोडीला सर्वत्र हिरवेगारपणा. दुरून दिसणारे चर्च आणि आत प्रत्यक्ष ते अनुभवताना चर्चच्या भव्यतेची जास्त कल्पना येते. इतकी जुनी, बारा-तेराव्या शतकातील ही वास्तू भ कम बांध्याची, किती तरी पावसाळे अंगावर लीलया झेललेली असूनही गोंडस दिसत होती. भाविकांचे, विद्यार्थी मुलामुलींचे वेगवेगळे गट विखुरलेले. सारा परिसर तुडविणे हे प्रभूचरणी शरण जाण्यासारखे होते. आम्ही आमची पदयात्रा चालू ठेवली होती. पाडगावकरां-करता चाकाच्या खुर्चीची सोय केली होती. या परिसरात अभ्यासिका, वसतिगृह थोड्याच अंतरावर होते. आम्ही त्याचे दूरदर्शनच घेतले.

कॅनन लेअर या आर्चबिशपांच्या वतीने स्वागतास आल्या. मंगेश पाडगावकरांबरोबर त्यांच्या मनमोकळ्या गप्पा झाल्या. भारत-मग महाराष्ट्र त्यातील मुंबई त्यातील मराठी भाषा हे सारे क्रमाने लेअर समजून घेत होत्या. दहा कोटींहून जास्त म्हणजे शंभर मिलियन लोक ही भाषा बोलतात हे त्यांना बुचकळ्यात पाडणारे होते. त्याहीपेक्षा त्यांना जाणून घेण्यात रस होता तो पाडगावकर या व्य तीबद्दल आणि त्यांच्या साहित्याबद्दल आणि विशेषकरुन त्यांच्या बायबलमध्ये असलेल्या रुचीबद्दल.

थॉमस बेकेटची ज्या ठिकाणी हत्या झाली तो त्या चर्चचा एक कोपरा. कॅनन आम्हाला तिथे घेऊन गेल्या. भिंतीवर तीन मोठ्या तलवारी अडकावून ठेवल्या होत्या. त्यापैकी एक बहुधा तलवारीच्या आकाराचे धारदार वजनाचे, खूप जड असे शस्त्र होते. खंजीरासारखे. ते बघतानाही याचा घाव किती वेदनामय व जीवघेणा असेल याची कल्पना येत होती.

हीच ती जागा. थॉमस बेकेटला मारेकऱ्यांनी इथे घेरले आणि या खंजिरीने त्याच्या मानेवर, डो यावर वार केले. तो कोसळल्यानंतर या तलवारीनी त्याच्यावर वारांचा मारा केला. बेकेटने इथे प्राण सोडला.

त्या जागेवर THOMAS अशी अक्षरे कोरलेली आहेत. त्याच्या बाजूलाच कॅनन आणि कवीवर्य पाडगावकर उभे होते. त्यांनी बायबलचे मराठी भाषांतर चर्चला प्रदान करताना त्या संदर्भात काही बोलावे अशी कॅनन लेअर व इतर उपस्थितांची इच्छा होती.

शाळेत असताना बायबलचा आम्हाला एक तास असे, पाडगावकर बोलू लागले. त्यातील काही कवने आम्हाला रोज वाचून दाखवली जात, काही म्हणायला सांगत, काहींचा अर्थ सांगत. ते वय असे होते की कशाचेच काही संदर्भ लागत नसत, काहीच फारसे कळत नसे तरी ती भाषा मोहिनी घालणारी होती. मी त्या भाषेच्या, त्यातील अलंकारतीच्या, सौंदर्याच्या प्रेमात पडलो. ती इंग्रजी भाषा मला आवडू लागली. बायबलही समजू लागली. कालांतराने विवाह झाला. बायकोही ख्रिश्चन मिळाली आणि मी बायबलमयच झालो. शे सपिअरची इंग्रजी, बायबलची इंग्रजी, मनुष्याला समृध्द करणारी ही इंग्रजी भाषा!

मी मुळात कवी, भाषांतराकडे वळलो आणि बायबलपेक्षा जास्त उत्तम ते काय असणार? हे अनुभवाने मला पटले होते. बायबलचे शिवधनुष्य मी उचलले आणि माझ्या परीने मी प्रभू येशूची सेवा केली.


आज, या वयात कँटरबरीच्या कॅथड्रलमध्ये मी येशू शिकलो आणि अगदी योग्य जागी ही बायबलची मराठी भाषांतरित प्रत देऊ शकलो, ही केवळ परमेश्वरी इच्छा!

छोटासा समारंभ संपला. कॅथड्रलचे काही कर्मचारी, चर्च बघायला आलेले भाविक आणि आम्ही पाडगावकरांचे साथी-रामदास फुटाणे, मुकुंद नवाथे, दिलीप चावरे, प्रसाद महाडकर आणि डॉ. गोविंद काणेगावकर सारेच या अभूतपूर्व, आगळ्या-वेगळ्या क्षणाचे साक्षीदार मूकपणे मनाच्या कप्यात सारे नोंदवत होतो.

---

**– कुमार नवाथे**
साईप्रसाद, ६ वा मजला, दयाळदास रोड,
विलेपार्ले (पू.), मुंबई ४०० ०५७
मोबाईल : ९८६९०१४४८६.

दुसरी आवृत्ती
प्रसिद्ध



मूल्य १५० रुपये
सवलतीत ९० रुपये
घरपोच ११० रुपये

॥ग्रंथाली॥

आउशवित्झ छळछावणी
## नाझी नरसंहार
### कुमार नवाथे

डोळेही न उघडलेल्या कोवळ्या मुलांपासून अपंगत्वाने जखडलेल्या, म्हातारपण आलेल्या सधन-निर्धन स्त्री-पुरुषांना सरसकट गॅस चेंबरच्या लाव्हारसात जाळून संपवले गेले. कित्येकांना गळफासात अडकावले गेले, तर दिवसाढवळ्या हजारो जण बंदुकीच्या गोळ्यांचे शिकार झाले.
नाझींनी आउशवित्झमध्ये केलेल्या अमानुष छळाची आणि नरसंहाराची जाणिवांना आवाहन करणारी ही कहाणी...

१८ मे रोजी विजय तेंडुलकरांचा प्रथम स्मृतिदिन. त्यानिमित्ताने...

# बुद्धिवंतांची गोची!

**विजय तेंडुलकर** (मुलाखत : जयंत पवार)

विचारवंतांचा महाराष्ट्र. समाज-सुधारकांचा महाराष्ट्र. आज देशात अनेक बाबतींत महाराष्ट्र पुढारलेला आहे, त्यामागे ही परंपरा असल्याची आपली दृढ समजूत आहे. या परंपरेचे दोर आजही तितकेच बळकट आहेत का, हे पाहण्याची गरज आहे. किंबहुना ही परंपरा यापूर्वी तरी किती सश त होती, हे बघितलं पाहिजे. समाजसुधारकांचा कृतिशील वैचारिकतेचा वारसा पुढे उच्चशिक्षित प्राध्यापक-समीक्षक आणि साहित्यिकांकडे आला. समाजाचं बौध्दिक नेतृत्व कुणीही न सोपवताच त्यांच्याकडे गेलं, समाजानेही ते गृहित धरलं. पण त्यांनी या धुरिणपणाचं काय केलं? अनेक सामाजिक-राजकीय वावटळींमध्ये, संवेदनशील आणि प्रक्षोभक परिस्थितीत सर्वसामान्य लोकांचं जगणं पणाला लागलेलं असताना, एखाद्या कलाकृतीवरच्या हल्ल्यात, धार्मिक-जातीय दंगलींपासून ते खैरलांजीसारख्या निर्घृण हत्याकांडापर्यंतच्या घटनांमध्ये आपल्या बुध्दिवंत विचारवंतांनी काय भूमिका घेतली? जाहीरपणे कोणते विचार मांडले? की अधेमधे एखादा निघेधपत्रकासारखा सांकेतिक विधी उरकून ते गप्प बसले? या बुध्दिवंतांचं समाजाशी नेमकं नातं काय होतं? सर्व विचारप्रणाल्यांचा अंत झाला आहे, असं आज सर्वत्र बोललं जात असताना वैचारिक परंपरा मानणाऱ्या महाराष्ट्रात विचारवंत आणि बुध्दिवंतांचं काय झालं, हे एकदा समजून घेण्याची गरज आहे.

प्रसिध्द साहित्यिक विजय तेंडुलकरांना या विषयावर बोलतं करण्यामागे एक हेतू हा आहे की, त्यांनी अनेकदा आपल्या रोखठोक विधानांनी वाद ओढवून घेतले आहेत. आपल्याला दिसलं ते आणि खटकलं ते ते कुणाचाही मुलाहिजा न ठेवता बोलले आहेत. दुसरं असं की, त्यांनी काळाचा एक मोठा पट पाहिलेला आहे. समाजात साठ वर्षं लेखक म्हणून वावरताना त्यातली सर्व स्थित्यंतरं अनुभवली आहेत आणि त्यामधल्या विचारवंतांच्या वर्तनाला ते साक्षी आहेत. खुद्द त्यांनाही बुध्दिवादी विचारवंत अशी उपाधी अनेकांनी लावलेली आहे. वास्तवाकडे नितळपणे पाहणारे तेंडुलकर या विषयाकडे कसं पाहतात, हे बघणं त्यामुळेच मनोज्ञ ठरतं...

*विचारवंत कोणाला म्हणावं?*

ज्याच्याकडे स्वतःचं काहीतरी आहे, विचार नावाचं, तो विचारवंत. जो दुसऱ्याचेच विचार बोलतो त्याला आपण पोपट म्हणू. दुसरं म्हणजे, विचार हा मोकळा हवा. ज्यांच्या हातात आधीच सगळ्या प्रश्नांची उत्तरं आहेत, जे एका आयडियालॉजीमध्येच बुडालेले आहेत, त्यांना स्वतःचा काही विचार करता येतो का, असा मला प्रश्न पडतो. ते बहुधा ती आयडियालॉजीच बोलत असतात, किंवा तिने कधीकाळी दिलेली उत्तरं, जी आता माझ्या दृष्टीनं कालबाह्य झाली आहेत, ते ती देतात. मला त्यात रस नाही. कारण काळ समूळ बदललाय. ज्या गोष्टी पायावर उभ्या होत्या त्या आता डो यावर उभ्या असलेल्या मला दिसताहेत. या परिस्थितीत जेव्हा तो पायावर उभा होता तेव्हाची उत्तरं देऊन चालणार नाहीत. मा र्स, गांधी, सावरकर जर कोणी आज कोट करत असेल तर, त्याचा जो ऐतिहासिक संदर्भ असेल तो मी बघेन पण, ती आजची उत्तरं नव्हेत हे मात्र मी मनाशी प कं बांधेन. त्रिकालाबाधीत असं आज काहीही नाही. एकेकाळी तसं मानलं जात असे. पण आयुष्य किती बदलेल याबद्दलच्या माणसाच्या काही मर्यादा होत्या. ते काही अंशांनी बदलेल, असं तो मानत होता. औद्योगिक क्रांती होऊन होऊन किती होईल? भांडवलशाही, अमूकतमूक सगळं झालं. पण टे नॉलॉजी आल्यानंतर त्यामध्ये जो सगळा गोंधळ झाला तो त्या आयडियालॉजींना माहीत नव्हता. त्यामुळे त्यांनी दिलेली उत्तरं कालबाह्य झाली आहेत. मी परत गांधींकडे जाऊ शकत नाही. सावरकर आणू शकत नाही. मा र्सही आजच्या काळात असेल तर तो काही वेगळं बोलेल, असं मला वाटत नाही. किंबहुना मा र्सवाद्यांपैकी काहींना आज नव्याने विचार करायला हवा, हे लक्षात येतंय. चीनच्याही लक्षात आलंय की आपण ग्राऊंड रिॲलिटीबरोबर चालायला पाहिजे.

*आंबेडकरांबद्दल तुम्हाला काय वाटतं? अनेकांना आंबेडकर आजच नव्हे तर पुढच्या कैक वर्षांतही शिळे होणार नाहीत, असं वाटतं...*

अनेकांना हे गांधींबद्दल वाटतं, कोणाला सावरकरांबद्दल वाटतं. पण माझं मत तेच आहे, जे मा र्स, गांधी, सावरकरांबद्दल तेच आंबेडकरांबद्दल.

*काही विचारवंत या प्रत्येकातलं जे आजही लागू ठरेल ते उचलून त्यातून एक वेगळी आयडियालॉजी तयार करतात. जसा मा र्स-फुले-आंबेडकरांच्या विचारांतून शरद पाटलांनी 'माफुआवाद' तयार केला...*

मला वाटतं हे मागे बघत पुढे ढकलले जाणं आहे. समाज म्हणून आपण मागे मागे बघत जातो, हे काही खरं नाही.

*तुम्हालाही अनेकदा विचारवंत हे विशेषण लावलं गेलेलं आहे. तुम्ही त्याकडे कसं बघत होता?*

मी स्वतःला कधी तसं म्हणवून घेतलेलं नाही. मला जे वाटत आलं आहे ते निर्णायक आहे. असंही मी कधी मानलं नाही. मानत नाही. माझ्या काळाचा सगळा विचार करता, माझे जे संदर्भ आहेत ते बघता जे माझ्या डो यात येतं ते मी बोलतो. माझे निष्कर्ष कुठल्याही अर्थाने त्रिकालाबाधीत नाहीत. याहून ते वेगळेसुध्दा असू शकतात. त्यामुळे माझ्या मनाशी काही गैरसमज नाहीत. मी बोलतो याचं कारण एवढंच आहे की बोलल्याशिवाय मला चैन पडत नाही. माझा मी वचित बोलतो. पण कोणी विचारलं तर जे दिसतं ते बोलतो. आणि मी काही समाजाला सांगायला जात नाही. मी तुझ्याशी बोलतो, आणि कुणाशी बोलतो. ते पर्सन टू पर्सन असतं. मला असं वाटतं की, विचारवंत ही टर्म फार जपून वापरली पाहिजे.


तू बुध्दिवंत-विचारवंत असं म्हणतोस तेव्हा माझ्या मनाशी येतं की, तो हवेत विचार करणारा नसावा. यात वास्तव हा अत्यंत महत्त्वाचा भाग आहे. तुम्ही जे सुचवाल किंवा निर्देशित कराल त्याला वास्तवाचा आधार पाहिजे.

*असे विचारवंत तुम्हाला भोवती दिसतात का?*

विचारवंत सोड, मला विचारही कुठे दिसत नाही. मला तो पटेल किंवा न पटेल, तो आणखी पुढचा प्रश्न आहे. मला पटणाराच विचार हवा, असं मी मानत नाही. दुसऱ्या बाजूने काही येत असेल तर मी बघायला तयार आहे. पण आता जे सगळं समोर आहे ते आपण स्वस्त करून टाकलंय. ज्यांच्याकडे शब्दांचे धबधबे आहेत ते मागचा पुढचा विचार करताहेत, असं दिसत नाही. पोलिटिकल ॲनालिस्ट घे. लोकांच्या विसराळूपणावर यांचा फार भरोसा आहे. मागच्या महिन्यात काय बोललो हे त्यांना या महिन्यात आठवत नाही. मला वाटतं, आपण शब्दांची फेकाफेक खूप करतो. साहित्यातही तेच, समीक्षेतही तेच आणि पत्रकारितेतही तेच. मला नवीन काहीच म्हणायचं नसतं.

*आपण ज्यांना विचारवंत वा बुध्दिवंत म्हणतो, ते आणि सर्वसामान्य लोक यांच्यात फार मोठी गॅप आहे असं नाही वाटत?*

वाटतं ना. ज्याला मी ग्राऊंड रिॲलिटी म्हणतो, खटखटीत वास्तव, मग त्यात सामान्य असामान्य सगळे आले. त्यांच्याशी यांचं काहीच नातं नाही. कारण हे एका ठिकाणी



कधीच नसतात. तिथून दुसऱ्या ठिकाणी बहुधा विमानानेच जातात. तिथून आणखी तिसऱ्या ठिकाणी जातात. ज्या सर्कलमध्ये यांचं जाणं येणं असतं त्यांचा बाहेरच्या परिस्थितीशी काहीच संबंध नसतो. कोणी अमेरिकेत बसून इथे कसं वागायचं याचे शहाणपणाचे सल्ले देत असेल तर ते कसे मानायचे? त्यांनी इथे येऊन कामं करावीत. आज जो विचारवंत वर्ग म्हणून समोर येतो आहे तो मला तरी माझ्या उपयोगाचा वाटत नाही. बरं, प्रत्येकाचे काहीतरी ब्लाइंड पॉइंट्स आहेत. आता मो मराठीचा मुद्दा. पुढे सरकतच नाहीत. अरूण साधू किती मराठी मराठी करत होता. अरे काय झालं बाबा? कशासाठी हा आक्रोश चाललाय? शहरात तुला इंग्रजी ऐकू येते, खेड्यात गेलास तर तुला इंग्रजी ऐकू येते का? बरं, आमची पोरं आम्ही कुठे शिकायला पाठवली यावर मराठीचं भवितव्य कसं काय अवलंबून आहे? त्यामुळे मला ते अलीकडे 'अनुभव'च्या अंकात आलेलं जयदेव डोळे नावाच्या लेखकाचं मराठीच्या संदर्भातलं आर्टिकल आवडलं. त्याचा थिसीस थोडा वेगळा आहे, पण तो थेट बोलतो.

मूळात माणसाने कम्युनिकेट करणं हे अतिशय महत्त्वाचं. मी जे बोलतोय ते तुला कळलं पाहिजे आणि तू जे बोलतो आहेस ते मला कळलं पाहिजे. भाषा कुठलीही असेल रे. जी भाषा जगायला नालायक ठरेल ती मरेल. मराठीचं तरी तसं काय आज मला दिसत नाही. समज झालंच शंभर वर्षांनी, तर मरेल, भाषेसाठी ऊर बडवून रडायचं कारण काय? ज्यांच्याविषयी विचार करायला पाहिजे असे याहून गंभीर प्रश्न असताना ते सोडून तुम्ही भाषेचा प्रश्न सुप्रीम का मानताय मला कळत नाही. वेड्याला घेऊन पेडगावला गेल्यासारखं वाटतं मला हे. आता माझ्याआधी पु.ग.सहस्त्रबुध्दे वगैरे वापरत ती मराठी वेगळी होती, माझ्या काळात माझी मराठी वेगळी होती आणि आता ही जी मुलं 'लूज कण्ट्रोल'सारख्या नाटकात वापरतात ती मराठी वेगळी आहे. भाषा अशीच जायला पाहिजे. माझी भाषा ती पोरं कशी बोलतील? त्या पोरांची पोरं त्यांची भाषा कशी बोलतील? बरं, टे नॉलॉजी आणि इत या नव्या गोष्टी येताहेत की मराठी शुध्द राहाणं श य नाही. त्यात अनेक शब्द, अनेक वा यं इंग्रजी येतील. यात दुःख करण्यासारखं काय आहे? मला वाटतं, हे सगळं भलतंच कुठेतरी चाललेलं आहे. छोट्या माणसाचं आज काय होतं आहे, त्याला भवितव्य आहे की नाही, याविषयी नाही बोलायचं? ते मूळात त्यांना माहीत नसावं.

*पण ही गॅप कशामुळे निर्माण झाली असावी? तुम्ही म्हणता तसं कम्युनिकेशन*

*कशामुळे होत नाही?*

कारण वास्तवापासून त्यांचे पाय सुटलेले आहेत. ते असं समजत असतील की आपल्याला पूर्णपणे कळतं, पण त्यांचा सगळा सोर्स हा सेकंडरी आहे. ते खाली जमिनीवर किती उतरतात, असं विचारतो मी. ते इकडचं तिकडचं वाचून, इकडे तिकडे ऐकून बोलतात. आणि काही वेळा तर तिकडच्या ग्रंथातले रेफरन्स ते इकडच्या परिस्थितीवर बोलताना वापरतात, अशी अजब गंमत आहे. जसं एकीकडे भारत महासत्ता होणार म्हणून जसे दावे केले जातायत, उत्सव करतायत तसं हे एक वेगळं जग तयार झालंय, ज्याच्या वास्तवाशी काही संबंध नाही.

दुसरं, या इंटले युअल्सची भाषा सर्वसामान्यांना कळत नाही. एका जॉर्गनमध्ये ते अडकतात. त्यांच्यात्यांच्यात मात्र डायलॉग चालतो. एक उदाहरण देतो. मागे मुंबई दूरदर्शनसाठी मी 'दिण्डी' नावाचा कार्यक्रम करत होतो. तेव्हा त्यासाठी मी आणि निळू दामले पुण्याला गेलो होतो. तिथे एके ठिकाणी दिलीप चित्रे आणि भालचंद्र नेमाडे यांच्या गप्पांचा कार्यक्रम चालला होता. आम्ही बसलो. दोघंही अतिशय हुशार माणसं. पण संपूर्ण कार्यक्रम ऐकूनही ते काय बोलले हे मला कळलं नाही आणि निळूलाही कळलं नाही. कम्युनिकेशन म्हणजे सोपं करून बोलणं, अशी माझी साधी व्याख्या आहे. मला सदानंद मोरे हा माणूस आवडतो. तो सोपं, स्वच्छ लिहितो. ते पटो, न पटो, पण मला ते कळतं. अवघड गोष्टी सोप्या करणं हे साहित्याचं काम आहे. जागतिक संदर्भ कवितेत आले की तो कवी मोठा असं मानण्याची पध्दत आहे. अरूण कोलटकरला मी त्यासाठी मोठा मानत नाही. तो इथल्या जगण्याविषयी लिहितो, ते ज्या पध्दतीनं प्रसवतो ते ग्रेट आहे. कविता कशाने मोठी होते, लेखन कशानं मोठं होतं, हा मुद्दा आहे.

*आपण प्रत्येक गोष्टीसाठी अमेरिकेकडे बघतो. पण तिथे इंटेल चुअल्सचीही परंपरा आहे, हे आपण लक्षात घेत नाही. 'लॅश ऑफ सिव्हिलायझेशन'ची थिअरी मांडणारा सॅम्युअल हटिंग्टन आहे, आर्थर श्लेशिंगर होते, नोम चोम्स्की सारखा बुध्दिवंत आज आहे, ज्याने काही म्हटलं तरी त्याचे पडसाद उमटतात. सद्दामला फाशी दिल्यानंतर ते म्हणाले होते की, या न्यायाने अमेरिकन राज्यकर्त्यांना अनेकदा फाशी द्यायला हवी होती. या विधानाचाही प्रभाव पडतोच.*

चोम्स्कीचा एक इम्पॅ ट आहे. पण त्याने घडणाऱ्या गोष्टींमध्ये काही बदल होतो, असं मला वाटत नाही. तो आज मायनॉरिटीचा विचारवंत आहे. आणि अमेरिकेत चोम्स्की किती आहेत? एकच आहे. अर्थात त्याच्या विचारांचा किती उपयोग होतो, हा भाग वेगळा आहे. पण भूमिका घेण्यावरून माणसाचं एक वेगळेपण जाणवंत. प्रस्थापित गोष्टींना चॅलेंज करायला एक वेड अंगावर घ्यावं लागतं. मग तुम्ही काहीही करा, तो तेच करणार. चोम्स्कीचं तसं आहे.

*आपल्याकडे असं चित्र का दिसत नाही?*

आपल्याकडे एखाद्या माणसाला विचार मांडायला जे प्रोजे शन पाहिजे ते नाही. ते मांडायला स्कोप हवा, तो नाही. एकतर आपल्याकडे डिपार्टमेंटलायझेशन झालंय. साहित्यातल्या लोकांनी जगणं बघू नये? साहित्य संमेलनात साहित्यावरच बोलणं गरजेचं नाहीये. बोला ना वेगळं. म्हणतील, गैरलागू भाषण केलं. म्हणूदेत. सो व्हॉट?

*एक असं दिसतं की, कोणी स्वतंत्र विधान केलं की साहित्यिक-वैचारिक वर्तुळात सावध प्रतिक्रिया उमटतात. प्रतिक्रिया देताना लोक आपले हितसंबंध सांभाळतात, जसं की, युतीच्या काळात पु.ल.देशपांडेंनी महाराष्ट्र भूषण पुरस्कार स्वीकारताना सरकारवर टीका केली...*

काय होतं त्या भाषणात? मूळात भाषण लिहिलं होतं. सुनीताबाईंनी पु.ल. शिवसेनेविषयी बोलले? तिच्यावर तुटून पडले?

*नाही. शिवसेनेविषयी त्यात काही नव्हतं.*

मग? मूळात तुम्ही शिवसेनेच्या डायसवर जायचं. शिवसेना हा विषय बदलून बाकी विषयांवर बोलायचं अभिव्य ती स्वातंत्र्याचा मुद्दा होता भाषणात. कोणी धो यात आणलं होतं. अभिव्य ती स्वातंत्र्य त्या वेळेला? संबंध काय? श्रीकृष्ण अहवाल येऊनसुध्दा हा माणूस (ठाकरे) बसलेला आहे माझ्यासमोर, हे नको होतं बोलायला? हे आपल्याला माहीत आहे आणि पीएलना माहीत नव्हतं? तुम्ही सत्यकथन करता म्हणजे काय करता? तुम्हाला सुरक्षित असं एक सत्य बोलता!

*त्यानंतर चर्चा झाली ती ठाकरे पुलंच्या व तव्यावर जे बोलले त्यावर, काहींना ते झोंबलं, पण अनेक सावधपणे व्य त झाले...*

माझ्यादृष्टीने ठाकरे जे बोलले त्यात अनपेक्षित असं काही नव्हतं तो माणूस आमची किंमत बरोबर करतो, असं माझं म्हणण आहे. साहित्यिकांचं जग किती खोटं आणि छोटं आहे, ते त्याने बरोबर जोखलेलं आहे. पी.एल.चा आणिबाणीच्या वेळचा भाषणांचा संग्रह काढून काय म्हणतात ते बघ म्हणजे कळेल. जयप्रकाशांच्या डायरीचं प्रकाशन झालं तेव्हा आधी त्यांनी नाव नव्हतं दिलं.

*आणिबाणीचाच विषय आला म्हणून विचारतो, दुर्गा भागवतांनी नव्हते का स्पष्ट विचार मांडले? बुध्दिवंत-विचारवंतांच्या त्या प्रतिनिधी होत्या. तेव्हा त्यांना रणचण्डिकाही म्हटलं जात असे.*

एक खरं आहे की त्या यांच्या मानानं वेड्या होत्या. व्यवहारचातुर्य नावाची गोष्ट त्यांच्याकडे नव्हती. त्यामुळे त्या रिॲ ट झाल्या. त्यांचं पुढे जे होत गेलं त्याविषयी मला फार मोठे प्रश्न पडतात. आणिबाणीत त्यांना पकडलं. ए लासमध्ये ठेवलं. त्यांची सगळी व्यवस्था जेल सुपरिटेण्डेण्ट स्वतःपाहात

होते. ते जणू पाहुणी आल्यासारखे त्यांना वागवत होते. आता, तुरुंगात गेले, याचं भांडवल काय करतात त्या? त्याचवेळी समाजवादी, संघातले, अनेक कार्यकर्ते सी वर्गात होते. त्यांचे हाल होत होते. त्यांनी असं म्हणायला नको होतं, की मी काहीच केलं नाही. जे केलं ते ह्या माणसांनी, दुर्गाबाई इम्पसिव्ह होत्या. पण ते पुन्हा वसूल करणं. यातून त्याही सुटल्या नाहीत.

*सामान्य माणसांपासून बुध्दिवंत दूर राहिला. पण सरकारवरही त्यांचा धाक आहे. असं दिसत नाही...*

बुध्दिवंत वगैरे शब्द आपण विसरूया. जो माणूस विचार करतो त्याच्याकडे निर्भयपणा नाहीये. मागंपुढं बघून तुम्ही सत्य बोलणार आहात काय?

*तेच मला विचारायचंय, सत्ताधारी आणि विचारवंतसाहित्यिकांचे संबंध आपण बघू. यशवंतराव चव्हाण साहित्यिकांना जवळचे. पण त्यांनीही कराड साहित्य संमेलनात आणिबाणीविरोधी ठराव येऊ नये म्हणून फार धडपड केली. तो ठराव संमेलनात आला असता तर असं काय मोठं बिघडणार होतं राजकारण्यांचं? पण त्याहून विचित्र गोष्ट अशी की असा ठराव येऊ नये म्हणून काही साहित्यिकच प्रयत्न करत होते म्हणे!*

करून करून काय केलं असतं सरकारनं आमचं? तुरुंगात टाकलं असतं? तुला त्यावेळची गोष्ट सांगतो. तिथे असलेल्या गृहस्थांनी मला ती सांगितली. नरहर कुरुंदकर होते त्यावेळेला. कुरुंदकरांविषयी लोकांना त्यावेळी फार होतं. तर ते मधल्या वेळेत सांगत होते की, यशवंतराव हा फार भयंकर माणूस आहे. आपलीसुध्दा शाश्वती नाही, जपून असायला पाहिजे. आता काय करणार होते यशवंतराव चव्हाण? आपल्या छोट्या छात्या यांनी फुगवायच्या. याच्यापासून धोका आहे, असं म्हणायचं. यशवंतरावांच्यादृष्टीने हे सगळे करमणूक करणारे विदूषक. त्यांचे दरबार भरायचे. दुर्गाबाईसुध्दा त्यात एकदा गेल्या होत्या. नंतर पुन्हा गेल्या काय, मला माहीत नाही. पाडगांवकर जायचे. सगळे जायचे. मधु मंगेश कर्णिकांचा यात पुढाकार असायचा. आता तुम्ही सगळे जर यांचे असे याचक होता तर ते तुम्हाला काय किंमत देतील? आजच्या आणि कालच्याही, राजकारण्यांच्या मनात आमच्या सगळ्यांच्या विषयी कंटेम्प्ट सोडून काही नाही, नव्हतं. मी हे अधिकाराने सांगू शकतो. यशवंतराव काय, ठाकरे काय, सगळ्यांच्या दृष्टीनं आम्ही अगदी क्षुल्लक, क्षुद्र आहोत.

*पण मग समाजात विचारवंत हवेत की नकोत? त्यांच्यापाशी उपद्रव मूल्य असणं गरजेचं आहे की नाही?*

विचारवंत हवेत ना. गरज तर आहेच. उपद्रव्य मूल्यही हवं. पण ते कोणी करत नाही ही वस्तुस्थिती आहे.

*जगातल्या अनेक देशांत ज्या प्रकारची मुस्कटदाबी चालते, लिहिणाऱ्यांवर दडपण येतं तशी परिस्थिती इथे आहे, असं दिसत नाही...*


मी तुला सांगू का? असं का ही नाही. आणिबाणीमध्येसुध्दा अभिव्य ती

स्वातंत्र्यावर कसला घाला आला होता, ते अजून मला कळत नाही. कोणाची अभिव्य ती अडली होती? त्यावेळी फ त 'साधना'चे यदुनाथ थत्ते आणि 'ओपिनीयन'चे संपादक ही दोनच माणसं खऱ्या अर्थाने आणिबाणीशी लढलेली मला माहीत आहेत.

*संयु त महाराष्ट्राच्या चळवळीत मात्र विचारवंतांनी आवाज उठवला होता, असं नाही वाटत? डांगे, अत्रे, एस.एम.जोशी...*

हो, पण हे सगळे राजकारणी होते. अत्रे हे एकच लेखक, साहित्यिक म्हणावे, असे होते. राजकारणामध्ये जे होते त्यातल्या काहींनी वेगवेगळ्या प्रसंगी धैर्य दाखवलं, अंडरग्राऊंड राहिले, जेलमध्ये गेले असं तुला दिसेल. साहित्यिक, विचारवंत यांच्याबद्दल


**दोन ताजी प्रकाशने**



**आधुनिक अर्थशास्त्राचे निर्माते**

**यशवंतराव पंडितराव**

मूल्य १०० रुपये : सवलतीत ६० रुपये



**बालकल्याण ते बालकहक्क**

**माधुरी भिडे**

मूल्य ५० रुपये : सवलतीत ३० रुपये

आपण बोलत असू तर तू मला उदाहरण दे.

*क्रायसिसमध्ये इतर क्षेत्रातले विचारवंतही त्या त्या क्षेत्रापुरतेच मर्यादित राहिले...*

त्याचं कारण, आपल्याकडे हितसंबंध विसरून काही ॲडजस्ट करणं, ही प्रवृत्ती नाही.

*कलावंतांनीही त्यांच्या कलाकृतीवर घाला आला तेव्हा एकत्रित आवाज उठवलेला नाही. ते भिऊनच राहिले...*

त्यांच्या विचाराशी तसा संबंध नाही. असं आपण सगळ्यांनाच ओढण्यात काही अर्थ नाही.

*विचारवंतांनी कृतीही करावी, असं तुम्हाला वाटतं का? अलीकडे 'कृतिशील विचारवंत' असा एक शब्दप्रयोग अस्तित्वात आला आहे...*

विचारवंत हा कृतिशील नको काय? त्याचे कपडे कोणी सोडायला लागलं तर काय कृती करायची नाही त्याने? 'कृतिशील' हे आणखी विशेषण काय त्याच्यामागे? विचारवंतांनी नेसेसरिली तलवार घेऊन, पिस्तुल घेऊन बाहेर पडावं अशी माझी अपेक्षा नसते. पण तो विचार मांडायला जो निर्भयपणा पाहिजे, त्या विचारासाठी आपलं काही गमावण्याची तयारी पाहिजे, ती जर नसेल तर मी त्याला व्यक्तिशः विचारवंत मानत नाही.

*पण समजा असं कोणी धाडसानं बोललं तर त्याच्यामागे उभे राहणारेही नाहीत. तुम्हाला स्वतःला याचा अनुभव अनेकदा आलेला आहे.*

माझ्या मागे किती लोक असतील, हा विचार करून पोझिशन घेता येत नाही. मी असं गृहित धरतो की कुणीही नसेल. सो व्हॉट? विचार पुढे किती ॲक्सेप्ट होईल यात आता आपण जातच नाही आहोत. बोलणं आणि थेट बोलणं, महत्त्वाचं. एस.एम.जोशी थेट बोलायचे. वेगळा माणूस होता तो. पण मी त्यांना विचारवंत मानत नाही. डांगे हा हुशार माणूस होता. जेव्हा कम्युनिस्ट पार्टीत त्यांना कोणी विचारायचं तेव्हा ते आपल्या पध्दतीनं छान सांगायचे. पण ते सगळ्या ॲसिड टेस्टमध्ये कायम दोरीवर होते. तिथून ते खाली आल्याचं तुला कधी दिसणार नाही. त्यांच्यापेक्षा कम्युनिस्ट गोटामध्ये मी बी.टी.रणदिवेंना अधिक मानतो. त्यांनी चुका अधिक केल्या असतील. पण ते स्वच्छ होते. डांगे चुकाही करत नसत आणि बरोबरही करत नसत. मला मजा वाटायची, जसे रणदिवे तिकडे, तसे समाजवाद्यांच्या बाजूला एसेम. एकदा मी त्यांच्याकडे गेलो होतो. एसेम आणि नानासाहेब गोरे दोघं समोरासमोर बसून सकाळचा पेपर वाचत होते. माझ्याकडे दोघांचंही लक्ष नव्हतं. उगाच चावी मारावी म्हणून मी नानासाहेबांना विचारलं, काय नानासाहेब, इंदिरा गांधींचं जे काही चाललंय त्याबद्दल काय वाटतं? त्यांनी पेपर खाली ठेवला आणि दहा पंधरा मिनिटं त्यांचं जे काही विश्लेषण होतं ते तपशीलवार सांगितलं. एसेम ऐकत होते. म्हणाले, 'तेंडुलकर मला विचारा ना. आम्ही डाव्या हाताला चुना लावून बोंबा मारत फिरायचं आणि हिनं आमच्यापुढे धावायचं, असं चाललंय.' एका वाक्यात थेट बोलून मोकळे झाले. विचारवंतांचं असं नसतं. ते मत एक देतात, पण ते मतच नसतं. मग वाटतं, काय बोलले हे? काहीच बोलले नाहीत.

*राजवाड्यांना आपण इंटलेक्चुअल म्हणू? न.र.फाटक वगैरे...*

वेगही माणसं होती ती. ती काय म्हणत त्यातला कन्टेन्ट तसाच राहिला आहे. फाटक इतिहासकार होते, इतिहासाच्या बाहेर त्यांचं काही नाही.

*तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी?*

ते सगळ्यांशीच बरे होते. अजातशत्रू.

*इरावती कर्वे?*

त्यांच्या क्षेत्रात ती मोठी माणसं होती. त्यांच्याकडे व्यापक विचार फार नव्हता. आपण ज्याला वास्तव म्हणतो. ते त्याहून वेगळं आहे. ते पुरातन नाही, भविष्यकालीन नाही. ते आत्ता आहे. ही जी आपापल्या नादात गुंतलेली माणसं आहेत त्यांच्याकडनं मला अपेक्षा नाहीत.

*पण आपल्या काळाशी नातं राखणं ही तशी कठीणच गोष्ट आहे, असं नाही वाटत तुम्हाला?*

आहे ना. पण माझ्यासाठी ती या अर्थानं कठीण झाली आहे की, आजच्या काळाचा वेग मला पकडता येत नाही. त्याच्या गतीनं चालता येत नाही. गुंता त्या काळातही होता, पण तुम्ही तो फॉलो करू शकत होता. आज असं झालेलं आहे की, तुम्ही तो समजावून घ्यायच्या आत तो अजून पुढे गेलेला असतो. आज वास्तवाबरोबर धावणं सोपं नाही. आज काही बोलायचं असेल तर आधी मला ते कळलेलं आहे की नाही, हाच प्रश्न आहे.

*म्हणजे कुठ्यालाही विचारवंताची गोची करणाराच हा काळ आहे, असं म्हणायला हवं...*

होयं, खूप व्यावहारिक शहाणपण असणं, हेच आज गरजेचं झालेलं आहे. निर्भयपणे विचार मांडायला जो वेडेपणा हवा असतो त्या वेडेपणाचा अंत झाला आहे. जसं एन्ड ऑफ आयडियालॉजी म्हणतात तसा हा मॅडनेसचाही एन्ड आहे. काही काही माणसं बोलताना दिसतात. पण ती आज बाजूला पडलेली आहेत. जसा आमचा निळू दामले काही वेळेला अतिशय ओरिजिनल गोष्टी बोलतो. पण त्याच्याबद्दल कुठेही रिस्पेक्ट नाही. ही माणसं चांगल्या पोझिशनला येणारच नाहीत, असंही मी म्हणणार नाही. पण परिस्थितीच प्रतिकूल आहे. स्वतःशी प्रामाणिक राहणं हे सर्वाधिक महत्त्वाचं आहे, पण ते आज महत्त्वाचं मानलं जाताना दिसत नाही.

---

('महाराष्ट्र टाइम्स-सांस्कृतिक ०७' मधून)

# स्वरांच्या अुच्चारांचे प्रमाणीकरण : मुलभुत स्वरांची ओळख

(वेलांट्या 'ी' अशा, अुकार ' ु'असे आणी स्वर-अक्षरे 'अ, आ, अी, अी, अु, अू, अे, अै, अॅ, आॅ, ओ, औ' अशी आहेत.)

'प्रमाणीकरण' म्हणजे भाषा बदलणे नव्हे. 'प्रमाणीकरण' म्हणजे 'भाषा मॅनेजमेंट' होय. ज्यांचे प्रमाणीकरण करायचे आहे त्यांचे, 'वीवीध घटक ओळखणे', 'त्यातील साम्य व फरक अुलगडणे', 'त्यांचा परस्परांशी असलेला संबंध दाखवणे', 'संवादातल्या अर्थ नीर्मीतीतील सहभाग नीश्चीत करणे',... वगैरे गोष्टी यात मोडतात.

'अ, आ, अी, अु, अे, ओ, अॅ आणी आॅ' ह्या आठ स्वरांचा अुच्चार जरी; अेक, दोन, तीन,... असा कीतीही सेकंद वेळेचा केला तरी; त्यांचा अुच्चार 'अभंग आणी अखंडीतपणे' अैकु येतो. यात जे 'अभंग आणी अखंडीतपणे अैकु येते', त्याला त्या स्वराचे 'जातीगुणवैशीष्ट्य' म्हणतात. त्याचा संबंध 'अुच्चाराने घेतलेल्या वेळेशी' नसतो. 'फ्री वेन्सी', 'लाअुडनेस' आणी 'अुच्चाराने घेतलेला वेळ', याशीवाय जे वेगळे गुणधर्म ध्वनीत असतात त्यांना 'जातीगुणवैशीष्ट्य' म्हणतात. सृष्टीतील अगणीत 'जातीगुणवैशीष्ट्य' आपल्याला अैकु येतात.

'अैकु येणे' ही अनुवंशीकतेतुन प्राप्त होणारी नैसर्गीक देणगी आहे भाषेच्या 'अुच्चारांचे' 'शीक्षण' घ्यावे लागते, भाषा 'अैकु येणे' याचे 'शीक्षण' घ्यावे लागत नाही. सर्व मानवी भाषा सर्वांना 'अैकु येतात'. 'अैकु येणे' म्हणजे अर्थ जाणणे नव्हे, केवळ जातीगुणवैशीष्ट्ये ओळखणे होय.

'व्यंजन-स्वरांच्या' भीन्न 'जातीगुणवैशीष्ट्यांचे', सर्व व्य तींचे 'अुच्चार' समान असतात. व्य तींच्या जातपात, धर्म, रंग, रूप, वयोमान, लींगभेद, अुंची-जाडी-वजन, स्थळ-काळ, अुष्णता-थंडी, आराम-कष्ट,.. वगैरे बदलप्राप्त गोष्टींचा परीणाम 'अक्षरांची ओळख पटणे' यावर थोडा सुद्धा होत नाही. कोणत्याही व्य तीने अुच्चारलेल्या 'व्यंजन-स्वरां'चे जातीगुणवैशीष्ट्य अबाधीत राहते, म्हणुन तर मानवाला भाषा बनवता येतात, संवाद साधता येतो.

मराठी स्वरांच्या 'जातीगुण-वैशीष्ट्यांची ओळख', 'त्यांची स्मृतीतील साठवण' आणी 'त्यांचा अक्षरातुन वापर करण्यातली समज', सर्व मराठी व्य तींच्या वीवीध बोलींची सारखीच असते. 'भाषेचे प्रमाणीकरण' म्हणजे 'अेखादी बोली-भाषा समाजावर लादणे नसुन', 'अहीराणी, कुडाळी, कोकणी, कोल्हापुरी, खानदेशी, गोमांतकीय, पुणेरी, मालवणी, वऱ्हाडी,.. वगैरे 'बोली', मराठी का ठरतात?' हे शोधणे होय.

प्रत्येक अुच्चाराला 'सुरवात, शेवट व त्यामधील प्रवास' असतो, त्याला 'अुच्चाराची चौकट' असे म्हणु. वरील आठ स्वरांच्या 'अुच्चार चौकटीत' प्रत्येकी अेकच 'जातीगुणवैशीष्ट्य' असते. 'जातीगुण-वैशीष्ट्य' साकार होण्यासाठी अुच्चाराला जो कमीतकमी वेळ लागतो त्याला 'आखुड अुच्चार' म्हणु. अुदा : 'अ'चा 'आखुड अुच्चार' वेळ, 'आ'च्या 'आखुड अुच्चार' वेळेच्या नीम्मा असतो. 'जातीगुणवैशीष्ट्य' आणी 'अुच्चार-वेळ' ही दोन भीन्न अस्तीत्वे आहेत. **'मुलभुत' आणी 'ओघवते' असे स्वरांचे दोन भाग पाडल्याशिवाय प्रमाणीकरण साध्य होणार नाही.**

**मुलभुत स्वर :-** १) 'मुलभुत स्वराच्या' 'अुच्चार-चौकटीत' अेकच 'जातीगुणवैशीष्ट्य' असते. अुदा : वरील आठ स्वरांपैकी कोणताही स्वर सलग पाच सेकंद अुच्चारला असता अेकच अखंडीत 'जातीगुणवैशीष्ट्य' अैकु येते. २) 'मुलभुत स्वर' म्हणजे अेकाच जातीगुणवैशीष्ट्याचा सर्वात 'आखुड अुच्चार' होय. अुदा : 'अु' आणी 'अु' यांचे 'जातीगुणवैशीष्ट्य' समान असते. त्यापैकी 'अु' हा स्वर जास्त 'आखुड-अुच्चाराचा' आहे, त्यामुळे तो 'मुलभुत स्वर' ठरतो. ३) 'मुलभुत स्वराचा' अुच्चार श्वास टीकेपर्यंत लांबवता येतो. अुदा : वरील आठ स्वरांचा अुच्चार श्वास टीकेपर्यंत वाढवता येतो. मराठीने 'ऋ, ॠ, लृ' स्वर स्वीकारले नाहीत कारण त्यांचा अुच्चार लांबवता येत नाही. ४) **मराठीत 'अ, आ, अी, अु, अे, ओ, अॅ, आॅ' हे आठ 'मुलभुत स्वर' आहेत.**

**ओघवते स्वर :-** मुलभुत स्वरांच्याच वापरातुन ओघवते स्वर बनतात. जर 'अ' स्वराच्या अुच्चारानंतर, हवेचा ओघ कायम ठेवत, 'अी' स्वर अुच्चारला तर 'अै' नीर्माण होतो. त्यात केवळ 'अी' स्वर लांबवता येतो आणी 'अ'चा अुच्चार व्यंजनासारखा क्षणभर टीकतो. 'अै'च्या 'अुच्चार-चौकटीत', 'अ' आणी 'अी' अशी दोन जातीगुणवैशीष्ट्ये असतात. 'अ+अु=औ' बाबत तसेच घडते. 'अी आणी अु' या मुलभुत स्वरांचा आखुड अुच्चार-वेळ, 'आ' स्वराच्या आखुड अुच्चार वेळे अेवढा लांबवला की 'अी आणी अू' बनतात. **मराठीत 'अै, औ, अी, अू' असे चार ओघवते स्वर आहेत.** अधिक माहितीसाठी संपर्क साधा.


**– शुभानन गांगल**

टेलीफोन : ९१-२२-२६२०१४७३
मोबाअील : ९८३३१०२७२७
वेबलींक : http://shubhanangangal.wetpaint.com/
अीमेल : gangals1234@gmail.com, gangals@ymail.com, gangals@live.in, gangals@in.com


# ग्रंथकल्याणी

विनायक गोखले

वाचनसंस्कृती हा शब्द आपण ऐंशीच्या दशकात वापरू लागलो. तोपर्यंत गेल्या शतकात छापील शब्दाचे महत्त्व भरपूर होते. दूरचित्रवाणी, संगणक व इंटरनेट याचा वापर दैनंदिन जीवनात जास्त होऊ लागला. त्यावेळी पुस्तकाची जागा इतर माध्यमे घेऊ लागली पण तरीही पुस्तकांचे महत्त्व कमी झाले नाही. भारतात सोळा हजर प्रकाशनसंस्था आहेत. दरवर्षी भारतात ऐंशी हजार पुस्तके प्रसिद्ध होतात त्यातील अठराहजार पुस्तके इंग्रजी भाषेतील असतात. गेल्या वर्षी इंग्रजी आणि प्रादेशिक भाषेतील पुस्तकांची विक्री साधारणपणे पन्नास-पन्नास ट के झाली असावी असा अंदाज भारतीय प्रकाशन संघटनेने व्य त केला आहे.

या पुस्तकांचा ग्राहकवर्ग वैयतिक आवडनिवड असणारे विविध भाषेतील व्य ती बरोबरच विविध प्रकारच्या ग्रंथालयासाठीही या पुस्तकांची खरेदी होते. या ग्रंथालयांनी गेली अनेक शतके विविध ग्रंथाचा संग्रह केला. त्याचा फायदा अनेक विद्यार्थ्यांना, संशोधकांना झाला. त्यातून त्यांनी पुढे नवीन ग्रंथ लिहिले. आपल्या ज्ञानाचा, अनुभवाचा फायदा सर्व समाजाला करून देण्यासाठी ग्रंथव्यवहारातील सर्व घटकांनी केलेले प्रयत्न म्हणजेच वाचनसंस्कृती. यामध्ये सार्वजनिक ग्रंथालयाचे काम अतिशय महत्त्वपूर्ण आहे. भारतात महाराष्ट्रासह दहा-बारा राज्यात सार्वजनिक ग्रंथालय कायद्यान्वये ग्रंथालये चालवली जातात. महाराष्ट्रात शंभर वर्षाहून अधिक काळ वाचनसेवा देण्याचे काम करणारी सत्त्याहत्तर ग्रंथालये आहेत.

ठाणे जिल्ह्यातील कल्याण येथील सार्वजनिक वाचनालयाने ग्रंथकल्याणी हा संदर्भ ग्रंथ प्रकाशित केला आहे. त्यामध्ये एकोणीस लेखातून आपणास ही वैभवशाली परंपरा वाचण्यास उपलब्ध करून दिली आहे. लिपीचा शोध लागल्यापासून कोणकोणत्या माध्यमातून ग्रंथनिर्मिती करण्यास सुरुवात केली हे पहिल्या दोन लेखातून वाचावयास मिळते. त्यानंतरचा दोन लेखातून महाराष्ट्रातील वाचनसंस्कृतीचा विकास व ग्रंथालय चळवळ याविषयी अतिशय उद्‌बोधक व रंजक माहिती मिळते. तंजावर येथील सरस्वती महाल ग्रंथालयाची स्थापना सतराव्या शतकात झाली. भारतात सध्या अस्तित्वात असलेले हे सर्वात प्राचीन ग्रंथालय आहे. पेशव्यांचा काळात ग्रंथाला महत्त्व होते. त्यांनी जरी छापील ग्रंथ वा मुद्रणकलेला महत्त्व दिले नाही तरी अनेक हस्तलिखिते ते मिळवत व त्याचा संग्रह करत. इसवी सन १८१३ मध्ये इंग्रजी शिक्षणास प्रारंभ झाल्यावर नवशिक्षितांना ज्ञानग्रहण करण्याची आवड निर्माण होण्यासाठी ब्रिटिशांनी ग्रंथालये सुरू केली. यातूनच नेटिव्ह जनरल लायब्ररीच उदय झाला. असे पहिले ग्रंथालय १८३८ मध्ये अहमदनगर येथे सुरू झाले. या ग्रंथालयावर सरकारी नियंत्रणे भरपूर होती त्यामुळे त्याचा फायदा येथील सर्वसामान्य जनतेला होत नव्हता. १८८० नंतर मराठीत विविध विषयांवर ग्रंथनिर्मिती होऊ लागली. स्वभाषेच्या अभिमानामुळे मराठी ग्रंथांचा संग्रह करणारी ग्रंथालये सुरू करण्यासाठी प्रयत्न सुरू झाले. सन १८९३ मध्ये ठाण्यात मराठी ग्रंथसंग्रहालय कै. वि.स. भावे यांनी सुरू केले. त्यातून स्फूर्ती घेऊन सन १८९८ मध्ये मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय सुरू झाले. सदाशिव मोरेश्वर साठे या सुशिक्षित घरंदाज व्य तीने स्वत:च्या घरी आपला वैयतिक ग्रंथसंग्रह सर्वांसाठी खुला केला तो दिवस होता सन १८६४ मधील विजयादशमीचा.




मामलेदार म्हणून काम करत असताना सन १८७४ मध्ये त्यांचा स्वत:चा वाडा बांधून तयार झाला. आजही तो साठेवाडा म्हणून कल्याणमध्ये प्रसिद्ध आहे. आपल्या घरी पुस्तके नेण्यासाठी नागरिकांना संकोच वाटत आहे. हे लक्षात येताच ग्रंथालयाची जागा त्यांनी बदलली पारना यावरील दामोदर गणेश जोशी यांच्या जागेत सन १८७८ मध्ये हे वाचनालय सुरू केले व त्यावेळी मासिक वर्गणी फ त एक रुपया होती. वाचनालय सुरू करण्याची कल्पना त्यासाठी केलेले प्रयत्न व स्वत:चा ग्रंथसंग्रह असूनही पहिली वर्गणी स्वत:हून साठ्यांनी दिली ती तारीख होती ३ फेब्रुवारी १८७८.

सार्वजनिक काम करताना सर्वांना नियम सारखेच असले पाहिजेत. या नियमाचे पालन पुढील काळांतही होत राहिले त्यामुळे ग्रंथालयाचा व्याप वाढू लागला व तो सांभाळण्यासाठी शहरातल्या अनेक प्रतिष्ठित व्य ती पुढाकार घेऊ लागला. हा सर्व इतिहास खरोखरीच वाचण्यासारखा आहे. सार्वजनिक क्षेत्रांत काम करताना फ त आपण काम करत असलेली संस्था नावारूपास आणणे. समाजाला

जास्तीत जास्त त्याचा लाभ मिळवून देणे हेच एकमेव उद्दिष्ट असते. अनेक वादळी व्यक्तिमत्त्वांनी विविध पदावर काम केले. याचा सर्व इतिहास आपणास वाचावयास मिळतो. सार्वजनिक ग्रंथालयात विविध सांस्कृतिक कार्यक्रम होतात पण त्याला श्रोत्यांची उपस्थिती फारच कमी असते. चाळीस-पन्नास वर्षांपूर्वी घडलेले असे प्रसंगदेखील यात आहेत पण तरीही त्यावेळच्या कार्यकर्त्यांनी हार न पत्करता अनेक चांगले व ते संग्रहालयात आणले. पु.ल. देशपांड्यांच्या भाषणाचा किस्सा तर वाचण्यासारखा आहे.

गेल्या तीस वर्षात अनेक नवीन कार्यकर्ते ग्रंथालयाचा विस्तार वाढवण्याचे काम करत आहेत. रामबागेत एक शाखा सुरू आहे. कल्याण महानगरपालिका व स्थानिक आमदारांच्या साहाय्याने ग्रंथालयांचे संगणकीकरण सुरू आहे. E.Book विभाग सुरू केला आहे. पु.भा. भावे व्याख्यानमालेतून दर महिन्यास एक चांगला कार्यक्रम होत आहे.

या वाचनालयाच्या वाटचालीत अनेक कार्यकर्त्यांनी तळमळीने काम केले. त्यांच्याबरोबरीने अतिशय अल्प वेतनावर अनेक ग्रंथालय सेवकांनीही काम केले. त्यांच्याबद्दलही कृतज्ञता व्यक्त केली आहे. १४० वर्षांच्या संस्थेच्या इतिहासातील अनेक कागदपत्रे घटना यांच्या नोंदी त्यांनी शोधून दिल्या. त्यामुळे संपादकांचे काम सोपे झाले.

भविष्यकाळात सार्वजनिक ग्रंथालये कशी असावीत याचे विवेचन शेवटच्या लेखात आहे. शासनाने या सेवेसाठी अधिकाधिक मदत देणार असल्याचे जाहीर केले आहे. त्याचा फायदा सार्वजनिक ग्रंथालयांना होईल.

तरुण वाचक ग्रंथालयाचे सभासद होतील असे विविध नवीन उपक्रम भविष्य-काळात निश्चितच होतील. त्यातूनच चांगले कार्यकर्ते ग्रंथालयास मिळतील. आजचा जमाना मल्टीपलेक्सचा आहे. सार्वजनिक ग्रंथालयात लहान मुलांसाठी वाचन-साहित्याबरोबर अन्य उपक्रम तसेच घरातील अन्य व्यक्तींसाठी गायन, चित्रपट, नाटक यांचे प्रयोग असे विविध कार्यक्रम जर होत राहिले तर सार्वजनिक ग्रंथालये निश्चितच दर्जेदार सेवा समाजास देत राहतील.


जितेंद्र भामरे व प्रशांत मुल्हेरेकर या संपादकांनी व त्यांना सहकार्य करणाऱ्या त्यांच्या सहकाऱ्यांनी अतिशय परिश्रमपूर्वक हा ग्रंथ अल्पावधीत सिद्ध केला आहे. यापासून अन्य ग्रंथालयाच्या कार्यकर्त्यांनी स्फूर्ती घेऊन आपल्या ग्रंथालयाचा इतिहास प्रसिद्ध करणे आवश्यक आहे.

---

**– विनायक गोखले**
२०१, लक्ष्मी पॅलेस, कोपरी रोड,
नौपाडा, ठाणे – ४०० ६०२

---

ग्रंथाली
ताजे प्रकाशन



# प्रकाशवाट

## वंदना करंबेळकर

वंदना करंबेळकर यांच्या या अनुवादित कथा सकारात्मक दृष्टिकोनातून प्रकट होतात. त्यांतील नायिका सर्वसाधारण जीवनातील कोंडमाऱ्याचे अनुभव घेताना दमदारपणा दाखवतात; त्या ओघात त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास होत जातो.

मूल्य १२५ रुपये
सवलतीत ७५ रुपये
घरपोच ९५ रुपये

# आपण नाही तर कोण आणि आता नाही तर केव्हा?

## सचिन मंचभाई

सु.गो.तपस्वी त्यांनी त्यांच्या सामाजिक विषयावरील 'ट्रिलॉजी'तील 'विकासाची रूपरेषा' ह्या शेवटच्या पुस्तकाच्या प्रकाशना-दरमान घोषित केलेला महाराष्ट्रातील सत्श तीचा मेळावा पुण्याला २ व ३ मे २००९ रोजी संपन्न झाला. मेळाव्याला विविध कार्यक्षेत्रांतील व्य ती व मान्यवर सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते. योगायोगाने, कार्यस्थळ होते गांधी स्मारक निधीचे कोथरुड येथील गांधीभवन!

'ट्रिलॉजी'च्या उपक्रमादरम्यान संपर्कात आलेल्या महाराष्ट्राच्या बहुतांश जिल्ह्यांतील विविध संप्रदायांच्या स्त्री-पुरुषांना तपस्वींनी मेळाव्यासाठी निमंत्रित केले होते. चर्चेसाठी पाठवलेल्या टिपणातून सुचवलेल्या चळवळीचे स्वरूप निमंत्रितांना व्य त झाले होते, तर कार्यक्रमपत्रिकेबरोबर सादर झालेली आणि सोबत पुढे दिलेली नियतकार्याची घोषणा (मिशन) चळवळीमागच्या भावनेच्या दृष्टीने बोलकी होती.

नियतकार्य (मिशन)

लोकशाहीसाठी मूल्याधिष्ठित समाज गरजेचा आहे. अशा परिवर्तनासाठी राजकारणी अग्रक्रम देत नाहीत आणि समाजकारणी स्वनियोजित कार्यांत अथवा तत्त्वांत अडकून पडतात. असहायतेच्या भावनेतून सज्जन व्य ती, सत्श ती एकाकी पडते, एकूणच, समाजकारण दुर्लक्षित राहत आले आहे. देशात विखुरलेल्या ह्या श तीला एकत्रित करून, मानवविकासातून सुदृढ समाजनिर्मिती साधण्याचा प्रयत्न, हेच या संघटनाच्या कामाचे स्वरूप असेल.

ग्रंथालीने वाचकांना 'इंटरनेट'व्दाराही निमंत्रित केले होते. उपक्रमाची पुरेशी पार्श्वभूमी माहीत नसतानासुध्दा काही वाचक मेळाव्याला उपस्थित राहिले. यावरून, लाभलेला प्रतिसाद आज समाजाला प्रस्तुतच्या चळवळीची नितांत गरज आहे हेच दर्शवून गेला.

महाराष्ट्रातील पन्नासहून अधिक व्य तींनी नोंदणीपत्राव्दारे उपस्थित राहण्याचा मानस व्य त केला होता आणि त्या दोन्ही दिवशी शहरात रि शांचा संप असूनही तीसच्या वर लाभलेली उपस्थिती ही दखलपात्र घटना मानली पाहिजे. ह्या निष्कर्षाचे गुणात्मक भान येण्याकरता हे लक्षात घेतले पाहिजे, की उपस्थित मंडळी म्हणजे सभेला जमणारे बघे नव्हते; ते होते चळवळ सुरू करण्यासाठी उत्स्फूर्त प्रतिसाद देणारे, जबाबदारी घेऊन काम करायला तयार असणारे, महाराष्ट्रातून ठिकठिकाणाहून स्वखर्चाने आलेले सामाजिक कर्तव्याचे पाईक!

''तपस्वी एका चळवळीची मुहुर्तमेढ करताहेत, त्यासाठी समविचाराने नाही तरी समभावनेने आपण एकत्र आलो आहोत.'' 'सकाळ'च्या आनंद आगाशे ह्यांचे हे प्रारंभीचे उद्गार जमलेल्या लोकांची मानसिकता सार्थपणे व्य त करतात.

पहिल्या दिवशी चहापानानंतर मोकळेपणाने चर्चासत्राला सुरुवात झाली. स्वतःची ओळख, कार्यक्षेत्र, सामाजिक कार्याशी सध्या असलेला संबंध, इत्यादी गोष्टींची प्रत्येकाकडून मांडणी झाल्यावर, ''देशातील सत्श तीच्या संख्येत वर्धन साधून निर्माण करायच्या संघटनाची देशाला, समाजाला गरज आहे का व असे संघटन प्रभावी ठरू शकेल का?'' हा प्रश्न विचारून तपस्वींनी चर्चेला वाचा फोडली आणि सर्व उपस्थितांनी या संबंधातील आपापली मते मांडायला सुरुवात केली. सत्श तीच्या व्याख्येपासून प्रश्नांची सरबत्ती सुरू झाली. मग, एकमेकांचे शंका-निरसन, थोडासा वाद आणि काही हास्य-विनोद, ह्या स्वरूपात चर्चा रंगत गेली.

झालेल्या प्रदीर्घ चर्चेत प्रामुख्याने व्य त झालेल्या विचारांतून पुढील मुद्यांची उजळणी झाली.

- आजही समाजव्यवस्था, समाजातील अडचणी व समस्या ह्या साऱ्यांतून दिसत असलेली समाजाची दुरावस्था,
- भ्रष्टाचार, भ्रष्टाचाराला पोषक अशी अर्थव्यवस्था व गरजेची अर्थक्रांती.
- लोकशाही मूल्यांची उणीव
- समाजजीवनात विशेषतः शहरांमध्ये अनुभवास येणारी बेशिस्तीची वर्तणूक आणि कायदा मोडणाऱ्यांकडे होणारे दुर्लक्ष व अंमलबजावणीतील दिरंगाई,
- अभिजनांची, मध्यमवर्गाची दिसून येणारी उदासीनता, भयगंडाची वृत्ती व त्यातून येणारी असहायता आणि त्यांची दृश्य स्वरूपातील हतबलता व नैराश्य,
- भारतीय घटनेत घोषित झालेले नागरिकांचे अधिकार व कर्तव्ये, त्याचे रोजच्या सामाजिक जीवनातील महत्त्व, त्या नियमांचा आदर व पालनाची आवश्यकता, आणि संविधानातील उणिवा, मूल्यांचा ऱ्हास, उद्याच्या पिढीच्या संदर्भातील मूल्ये व नीतीमत्ता,
- सुरू झालेल्या लोकसभा निवडणुकीतील पहिल्या दोन टप्प्यांत झालेली मतदानाची कमी ट केवारी व त्या अनुभवाची कारणमीमांसा,
- शासन व न्यायालयातील दिरंगाईमुळे

जाणवणाऱ्या समस्यांबाबत झुंडशाहीतून तोडगा काढण्याकडे जनसामान्यांचा झुकणारा कल,

● लाभार्थी व वंचित गट, पाणी, शिक्षण स्वास्थ, कृषी ह्यांसारख्या मूलभूत प्रश्नांकडे झालेले व होणारे दुर्लक्ष,

● राजकारण्यांच्या, लोकप्रतिनिधींच्या प्रबोधनाची गरज, त्यांच्या निर्णयप्रक्रियेत उपयु ततेपेक्षा लोकमताला असणारे अग्रक्रमाचे (पॉप्युलिस्ट) स्थान, सुचवलेल्या संघटनेची राजकारण, शासन ह्यांच्यावर प्रभाव पाडण्याची क्षमता, 'प्रेशर ग्रूप' निर्माण करण्यासाठी गरजेचे संख्याबळ व ते एकत्रित होण्याची साशंकता आणि प्रस्तुतच्या संघटनातून लोकप्रतिनिधींबरोबर संवाद साधू शकण्याची आवश्यकता व श यता.

देशातील आर्थिक, सामाजिक व इतर विषमतांच्या पार्श्वभूमीवर विविध सामाजिक व राजकीय पैलूंची दखल घेणारी, समस्यांच्या ऊहापोहातून कारणमीमांसा साधणारी व उपायात्मक सूचना (त्यांतील बऱ्याच जरी तात्त्विक होत्या) करणारी चर्चा दिवसभर रंगत गेली. जोडीला, मूळ उद्दिष्टाच्या दृष्टिकोनातून सभा विस्कळित होऊ शकण्याच्या भीतीने विद्या बाळ, शदर कुळकर्णी, विनया भागवत, कुमार सप्तर्षी आणि वसंत आपटे ह्या सदस्यांकडून, त्यांच्या निवेदनातून चर्चा मूळ उद्देशाकडे वळवण्याचा प्रयत्न होत असल्याचे जाणवले. मात्र, ''आपण फ त आपल्याला भेडसावणाऱ्या अडचणी सांगायला इथे जमलो आहोत काय?'' ह्या ज्येष्ठ कार्यकर्ते मुकुंद घारे ह्यांच्या खोचक प्रश्नानंतर चर्चेची दिशा बदलली आणि कार्याचे स्वरूप संस्थात्मक असावे की चळवळीचे? ह्या विषयावर मतप्रदर्शनास सुरुवात झाली. संदर्भातील अडचणी व कायदे ह्यांचा विचार व अपेक्षित अभिजन सदस्यांची सध्याची मानसिकता जमेस धरून, सुरुवातीस तरी काही वर्षे, संघटनेला चळवळीचे स्वरूप असावे ह्या विचाराला सभेत दिवसअखेर प्राधान्य मिळत गेले. पहिल्या दिवशीच्या चर्चासत्राचा समारोप दिनकर गांगलांनी प्रभावीपणे केला.

दुसऱ्या दिवशी प्रारंभीच कुमार सप्तर्षींच्या पुढाकारातून निर्णय घेण्यात आले, की प्रस्तुतच्या संघटनाचे रूप चळवळीचे असावे, निवडलेल्या कार्यक्रमातून सदस्यांनी स्वतः चळवळीचा प्रचार व प्रसार साधावा आणि एकूणच, लोकसंग्रहातून संख्याबळ वाढवण्याच्या प्रयत्नांना प्राधान्य द्यावे. ह्या निर्णयानंतर प्रत्येकाने स्वतः काय करू शकू व पहिल्या वर्षात काय साधू ह्या गोष्टीचे स्पष्टीकरण केले आणि आपोआपच चळवळीच्या पहिल्या टप्याचे स्वरूप स्पष्ट झाले.

दोनेक तास चाललेल्या ह्या प्रयत्नातून सदस्याने स्वतःला जसे बांधून घेतले, तसेच त्यामुळे उपस्थितांमधील आशंकेचे सावट दूर होऊन सभेत आत्मविश्वासाचे वातावरण निर्माण झाले. चळवळ लोकप्रिय करण्याचे उद्दिष्ट समोर ठेवून ती जनसामान्यापर्यंत पोचवण्यासाठी संख्याबळ वाढण्याची गरज ह्या वेळी आनंद आगाशे ह्यांनी परत व्य त केली आणि चळवळीच्या नामकरणावर चर्चा सुरू झाली. अनेक पर्यायांवर विचार झाला. अर्थवाही व सामान्य जनतेला स्पर्श करणारे नाव निवडताना 'जनसंवाद' ह्या संक्षिप्त नावावर एकमत झाले.

''बारसे तर झाले'', असे सांगत कामाची जबाबदारी घेण्यासाठी 'बाळाच्या बापाला'

'जनसंवादा'चा अध्यक्ष करण्याचा प्रस्ताव सप्तर्षींनी मांडला व विद्या बाळ ह्यांनी त्यास दुजोरा दिला. सोपवलेली जबाबदारी पहिल्या वर्षाकरता घेण्यास तपस्वींनी संमती दिली.

सदस्यांनी उत्स्फूर्तपणे स्वीकारलेल्या वैय तिक कार्यक्रमांनुसार चळवळीच्या पहिल्या वर्षाच्या कामाचे स्वरूप एक सामाजिक इंटरव्हेंशन (मध्यस्थी) करण्याचे असेल, हे पुढील उदाहरणांवरून स्पस्ट होईल.

● जनसंपर्कातून वैचारिक घुसळण,

● तालुका पातळीवर पोचण्याचा प्रयत्न,

● सामाजिक उद्‌बोधनाचे (एनलाईटनमेंटचे) कार्यक्रम,

● गरजेच्या माहितीचे संकलन, संशोधन,

● जात, धर्म (संप्रदाय), लिंग, शहरी-खेडूत असा कोणताही भेदभाव न करता जनसमुदायात प्रचार व त्यातून सामान्यांना चळवळीशी जोडून घेऊन लोकसंग्रह व सदस्यांची संख्यावृद्धी.

संपर्कासाठी माध्यमे व अर्थकारण ह्या विषयावर खालील निर्णय घेण्यात आले.

● प्रत्येक सदस्य स्वतःच्या कामाचे अर्थकारण साधेल.

● ग्रंथालीच्या 'रुची' ह्या मासिकाची दोन पृष्ठे 'जनसंवाद'च्या घडामोडींच्या माहितीकरता आणि वाचक व सदस्यांच्या संपर्क व प्रचारासाठी वापरण्यात येतील.

● सुरुवातीच्या वर्षात अध्यक्षाकडून साधायच्या संपर्ककामासाठी 'ग्रंथाली'चे कार्यालय वापरले जाईल.

● आपापसातील समन्वयासाठी पहिल्या वर्षात दर तीन महिन्यांनी सर्व सदस्यांचा मेळावा आयोजित केला जाईल.

● 'जनसंवाद'चा पहिला त्रैमासिक मेळावा शनिवार, ८ ऑगस्ट, २००९ रोजी पुण्यात घेतला जाईल.

रविवारच्या चर्चेदरम्यान प्रा. राम शेवाळकर यांच्या आकस्मिक निधनाची बातमी आली. शेवाळकर यांना शिवाजी विद्यापीठाचे माजी कुलगुरू, प्रा. धनागरे यांनी समयोचित श्रद्धांजली वाहिली.

मुकुंद घारे यांनी सुचवलेले घोषवा य संघटनेच्या उद्दिष्टाला नेमकेपणाने व्य त करणारे ठरले. ते वा य असे- 'आपण नाही तर कोणी आणि आता नाही तर केव्हा?' साऱ्यांनी त्यास उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

दुसऱ्या दिवशी जेवणानंतर दुपारी दोनच्या सुमारास मेळाव्याहून नागपूरला परतताना, एक सदस्य म्हणून, मला जसा 'काहीतरी' साधल्याचा आनंद मिळाला, तसेच अंगीकारलेले काम पूर्ण करण्याची जबाबदारी पेलण्याची उभारीही लाभली!

---


**- सचिन मंचभाई**
३१४, अभ्यंकर नगर
नागपूर - ४४० ०१०
भ्रमणध्वनी : ९४२३४ ०७ ०७२

ग्रंथाली

ताजे प्रकाशन

# वारस होऊ अभिमन्यूचे

## अनुराधा गोरे




XemgmRr VmeÊ`mMm hm_ H$aUmè`m
A{^_Ý`À`m `m H$Wm. Ë`m H$d i
"`ÕmÀ`m aå` H$Wm' ZmhrV. Ë`mnH$s
EH$mÀ`m dra_mVZ _mSbbm, Ë`mÀ`m
Y`mMm Am{U Ë`mÀ`m H$mQ{~H$
nmœ^_rMm hm nQ Amh. bîH$ar JUde
AJmda MTdÊ`mMm Ü`mg Am{U
~{bXmZmMr Amg RdZ h dra gÝ`mV
Xm I b hmVmV, nU Ë`mÀ`m dra_aUmda
CËñ\$V Am{U _Zm^md Agbm Var ì`ŠV
Pmbbm AmXa-A{^_mZ VmËH$m{bH$
RaVm h gm_m{OH$ gË` {dMmaàdÎm
H$aUma Amh. Á`mÀ`m {Odmda AmnU
ga{ j V OJVm Ë`mÀ`m~ÔbÀ`m
CXmgrZVbm `mV AmìhmZ Amh, VgM
ZmJ[aH$ åhUZ Amnë`m Am{U XemÀ`m
a j UmMm {dMma AmnUhr H$am`bm hdm h
AmdmhZ Ë`mV Amh.

मूल्य ३०० रुपये । सवलतीत १८० रुपये

घरपोच २०० रुपये